
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५



# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष चोविसावे / अंक ८ / ऑगस्ट २०२३

## संपादकीय

### राष्ट्रीय ग्रंथपाल दिवस

दरवर्षी १२ ऑगस्ट हा दिवस आपल्या देशात 'राष्ट्रीय ग्रंथपाल दिवस' म्हणून पाळला जातो. याचे कारण ग्रंथपालन शास्त्रास शास्त्रशुद्ध विज्ञानाची जोड देणारे डॉ. एस. आर. रंगनाथन यांचा त्या दिवशी वाढदिवस असतो. ग्रंथालय हे केवळ पुस्तकांचे संग्रहालय न राहता ती एक संस्था व्हावी म्हणून झटणाऱ्या डॉ. एस. आर. रंगनाथन यांचा जन्म १२ ऑगस्ट १८९२ मध्ये तमिळनाडूतील शियाली गावी झाला. तसे ते मूळचे गणितज्ज्ञ होते. त्यांनी गणित या विषयात एम. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आणि १९१७ मध्ये मंगलोरमध्ये गणित शिकवायला सुरुवात केली. १९२१ मध्ये मद्रासच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये त्यांची गणिताचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. त्यानंतर तीनच वर्षांनी त्यांना मद्रास विद्यापीठात ग्रंथपाल म्हणून नेमण्यात आले. या पदावर असताना त्यांनी १९२८ मध्ये 'मद्रास ग्रंथालय संघ' स्थापन केला. १९३१ मध्ये त्यांचा सर्वांत महत्त्वाचा ग्रंथ 'द फाइव्ह लॉज ऑफ लायब्ररी सायन्स' (The Five Laws of Library Science) प्रसिद्ध झाला. या ग्रंथाला जगनमान्यता मिळाली असून, भारतीय ग्रंथालयांची चौकट त्यांनी दिलेल्या या पंचसूत्रांवरच आधारलेली आहे.

ग्रंथालयात वाचकांना आवश्यक त्या सेवा पुरविणे, वाचकांचा वेळ वाचवून त्यांना योग्य मार्गदर्शन करणे हे ग्रंथपालाचे महत्त्वाचे काम आहे. ग्रंथपालाला मार्गदर्शक, शिक्षक, व्यवस्थापक अशा अनेक भूमिका बजावाव्या लागतात. नवनवीन माहितीचा साठा रोज निर्माण होत असतो. त्याची माहिती ग्रंथपालाला असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर ग्रंथपाल मृदूभाषी, सहकार्य करणारे आणि वेळेचे महत्त्व समजणारे असणे आवश्यक असते. ग्रंथालयात लहान मुले, विद्यार्थी, युवा, वयोवृद्ध, महिला मंडळी असे अनेक प्रकारचे वाचक येतात. अशा सगळ्या वाचकांकरिता वाचन साहित्य ग्रंथालयात असणे गरजेचे आहे. तसेच, योग्य ग्रंथाची निवड करायला मदत करणे आणि योग्यवेळी ते वाचकांना उपलब्ध करून देणे ही ग्रंथपालाची जबाबदारी आहे. 'माहिती, ज्ञान आणि संशोधन याचा मार्ग ग्रंथालयाच्या दारातूनच जातो' असे म्हटले जाते. ते सत्यात उतरविण्याची जबाबदारी ग्रंथपालावर असते. संशोधनाची

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

आवड असणारे लोक ज्ञान निर्माण करतात आणि ग्रंथालये हे ज्ञान पुढच्या पिढीला उपलब्ध करून देतात. आजच्या युगात ग्रंथपालास छापील पुस्तकांच्या बरोबरीने इलेक्ट्रॉनिक आणि ऑनलाईन पुस्तकेही संग्रही ठेवावी लागतात. ग्रंथ हे बंदिस्त न ठेवता ते उपयोगात आले पाहिजेत, प्रत्येक वाचकाला हवा तो ग्रंथ मिळाला पाहिजे, तसेच प्रत्येक ग्रंथ वाचला गेला पाहिजे अशा अनेक जबाबदाऱ्या ग्रंथपालाला उचलाव्या लागतात. आजच्या युगात पारंपरिक ग्रंथालयाने कात टाकली असून, ग्रंथालयात कृत्रिम बुद्धिमत्तेचा शिरकाव झाला आहे. ग्रंथपालन हे व्यवस्थापन शास्त्राप्रमाणे कला व विज्ञान यांचा संगम आहे. ग्रंथपाल ही एक नोकरी नसून, ती एक सामाजिक जबाबदारी आहे असे म्हटले जाते. आपल्या विद्यार्थ्यांना वाचन साहित्याची माहिती देणे आणि त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण करणे ही ग्रंथपालाची व्यावसायिक जबाबदारी आहे. त्यासाठी अद्ययावत साधनांचा उपयोग करण्यास ते सक्षम असले पाहिजेत. कारण सोशल मीडियाच्या युगातही 'वाचन-संस्कृती' जोपासणे ही काळाची गरज आहे.

ग्रंथालयाचे महत्त्व वादातीत असले तरी या चळवळीने आपल्या देशात मूळ धरले आहे असे म्हणता येणार नाही. पाश्चिमात्य देशांत प्रत्येक गावात एक समृद्ध असे ग्रंथालय आढळते. सिंगापूर, हाँगकाँग या लहानशा देशात देखील भव्य अशी ग्रंथालये आहेत. तशी स्थिती आपल्या देशात नाही. भारतातल्या काही मोठ्या शहरांमध्ये मोठी ग्रंथालये आहेत. परंतु लहान शहरांत, तसेच जिल्ह्याच्या ठिकाणी ग्रंथालय असेलच याची खात्री देता येत नाही. याउलट आपल्या देशातील काही जुनी ग्रंथालये बंद पडत आहेत असे चित्र दिसते. तंत्रज्ञानाच्या या युगात पाहिजे ती माहिती आंतरजालात उपलब्ध आहे. असे जरी असले तरी छापील पुस्तकांचे आणि ग्रंथालयांचे महत्त्व कमी होत नाही. म्हणूनच डॉ. रंगनाथन यांनी सुरू केलेली चळवळ पुन्हा जीवित करणे आवश्यक आहे असे सांगावेसे वाटते.

'विद्या प्रसारक मंडळा'ने ग्रंथालय विकासाकडे चांगले लक्ष पुरविले आहे. या मंडळाने चालविलेल्या शाळा आणि महाविद्यालयातील ग्रंथालये सुसज्ज असतील याची काळजी घेण्यात आलेली आहे. असे जरी असले, तरी या संसाधनांचा पुरेपूर उपयोग होते असे ठामपणे म्हणता येत नाही. बहुतांश विद्यार्थ्यांचा आणि प्राध्यापकांचा कल हा अभ्यासक्रमाशी संबधित पुस्तके हाताळण्याकडे असतो. संस्कृतीचा विकास, इतिहासाच्या पाऊलखुणा, आर्थिक घडामोडी अशा विषयावरचे त्यांचे वाचन नगण्यच असते. डॉ. विजय बेडेकर यांच्या पुढाकाराने ठाणे शहरात 'प्राच्यविद्या अभ्यास संस्था' स्थापन करण्यात आली आहे. या संस्थेत एक समृद्ध असे ग्रंथालय आहे. येथे काही दुर्मीळ हस्तलिखिते आहेत. या अमूल्य साठ्याचा किती उपयोग होतो याचा जर आपण विचार केला तर पदरी निराशाच येते. इंटरनेटचा प्रसार आणि सर्वत्र आढळणारे कोचिंग क्लासेस यांच्या प्रभावाने वाचन-संस्कृतीच लयाला जाते की काय अशी भीती वाटते. हे होऊ नये यासाठी वेळीच पावले उचलण्याची गरज आहे.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

●●●

व्ही.पी.एम्.

# दिशा

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

**वर्ष चोविसावे/अंक ८/ऑगस्ट २०२३**



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २८ वे/अंक २ रा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**


## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | चार ते चाळीस दिवसांचा प्रवास | विनीत वर्तक | २ |
| ३) | नमो सदा श्री नृसिंहसरस्वती महाराज (भाग - २) | सहा.प्राध्या. सुभाष गं. शिंदे | ५ |
| ४) | भारतातील पोलीश निर्वासित | संकेत कुलकर्णी | ७ |
| ५) | पाणतिपाता वेरमणी सिक्खापदं समादियामि । | प्रा. विनोद एच वाघ | ९ |
| ६) | प्रा. गं.बा. सरदार : विशुद्ध समाजप्रबोधक | प्रमोद वसंत बापट | १२ |
| ७) | कंबोडिया : अंकोर वाट | डॉ. प्रशांत धर्माधिकारी | १४ |
| ८) | लता मंगेशकर : स्वर जैसे कल्लोळ अमृताचे! | विनीता तेलंग | १७ |
| ९) | समकालीन आणि समकालीनत्व... | डॉ. आनंद कुलकर्णी | २१ |
| १०) | स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात रणरागिणी | प्रा. डॉ. नरेंद्र पाठक | २२ |
| ११) | रोहित शर्मा आणि शेअरबाजार | चन्द्रशेखर टिळक | २५ |
| १२) | भवभूती | दिलीप नारायण वंडलकर | २९ |
| १३) | परिसर वार्ता | संकलित | ३२ |




या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# चार ते चाळीस दिवसांचा प्रवास

*नुकत्याच झालेल्या चांद्रयान मोहिमेची यशस्वी झेप भारताच्या वैज्ञानिक विश्वात मोठी घटना होय. यावर प्रकाश टाकणारा ज्येष्ठ अभ्यासक विनीत वर्तक यांचा लेख - संपादक*

गेल्या काही दिवसांपासून इसरो आणि पर्यायाने भारताची खिल्ली उडवणारा एक मेसेज फेसबुक आणि व्हाट्सअपच्या माध्यमातून फिरतो आहे. एकीकडे जिकडे अमेरिका, रशिया आणि चीनची चंद्रयान ४ दिवसात चंद्रावर गेलेली आहेत, तिकडे भारताला मात्र ४० दिवस लागत आहेत! चंद्रयान आणि त्या मोहिमेतील तांत्रिक अडचणी याचा अभ्यास न करता फक्त राजकारणाच्या उद्देशाने जी चिखलफेक सुरू आहे ती नक्कीच कुठेतरी उद्विग्न करणारी आहे. यासाठीच ही पोस्ट लिहावीशी वाटली. चार ते चाळीस दिवसांचा हा प्रवास आपण समजून घेतला पाहिजे.




चंद्र जरी पृथ्वीवरून जवळ वाटत असला तरी पृथ्वी ते चंद्र हे अंतर सरासरी ३,८४,४०० किलोमीटर इतकं आहे. आपल्याला सर्वांना माहीत आहे की, पृथ्वी सूर्याभोवती फिरते आणि चंद्र हा पृथ्वी भोवती परिवलन करतो. जेव्हा आपण हे चित्र-स्वरूपात बघतो तेव्हा फक्त दोन पटलांवर बघत असतो. जर तिसऱ्या पटलाचा विचार केला तर असं लक्षात येईल की, ही दोन्ही परिवलनं एका सरळ रेषेत होत नसतात. आता हा झाला एक भाग. पृथ्वीवरून चंद्राकडे जाण्यासाठी आपल्याला दोन गुरुरुत्वाकर्षण शक्तींवर मात करत प्रवास करायचा असतो. पृथ्वीचं गुरुत्वाकर्षण इतकं प्रचंड आहे की, तुमच्या यानाचा वेग ४०,००० किलोमीटर / तास वेग गाठावा लागतो तेव्हाच तुम्ही पृथ्वीपासून अवकाशात प्रवास करू शकता. त्याचवेळी चंद्राच्या गुरुत्वाकर्षणात अडकण्यासाठी तुम्हाला यानाचा वेग ७५८० किलोमीटर / तास इतका कमी करण्याची गरज असते. चंद्राचं गुरुत्वाकर्षण पृथ्वीपेक्षा १/६ असल्याने वेगाचं हे गणित महत्त्वाचं आहे.

कोणत्याही चंद्र मोहिमेत सगळ्यात कठीण काम आहे ते वेगाचं नियंत्रण. पृथ्वी वरून सुटण्यासाठी एकीकडे तुम्हाला ४०,००० किलोमीटर / तास वेग गाठावा लागतो. पण हा वेग गाठला तरी पृथ्वी आणि चंद्र यातलं अंतर या वेगाने आपण ९ तास आणि काही मिनिटांत कापू शकू. त्याचवेळी आपल्याला ब्रेक लावून यानाचा वेग ७८५० किलोमीटर/ तास इतका कमी करायचा आहे. नाहीतर आपलं यान चंद्राच्या पलीकडे निघून जाईल किंवा चंद्रावर जाऊन आदळेल. आता आपण चंद्र आणि पृथ्वी यांच्या परिवलनाचा वेग लक्षात घेऊ. पृथ्वी स्वतःभोवती १६७० किलोमीटर / तास या वेगाने फिरते, तर चंद्र पृथ्वीभोवती ३६८३ किलोमीटर / तास या वेगाने परिवलन करतो आहे. आता हे सगळं सांगण्याचं कारण इतकंच की, पृथ्वीवरून निघताना कोणत्याही यानाचा वेग आणि वेळ अतिशय अचूक असणं गरजेचं आहे. जर का यातली एकही गोष्ट थोडी जरी चुकली

तर पुन्हा त्यात बदल करण्यासाठी अत्यंत कमी जागा उपलब्ध आहे.

अमेरिका, रशिया आणि चीन या देशांनी विकसित केलेली रॉकेट्स ही जास्त शक्तिशाली आहेत. त्यामुळे हे देश पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाचा प्रभाव मोडून आपली यानं थेट चंद्राकडे पाठवू शकलेले आहेत. रॉकेट जास्त शक्तिशाली करण्यासाठी आणि जास्त अंतर पार करण्यासाठी साहजिक रॉकेट बनवण्याचा खर्च जास्त येतो. रॉकेटला जास्त इंधन वाहून न्यावं लागते. त्याची यंत्रणा तितकी सक्षम करावी लागते. या सगळ्याचा आपण पैशाच्या स्वरूपात विचार केला तर ही रक्कम कित्येक कोटी अमेरिकन डॉलरच्या घरात जाते. या तिन्ही देशांनी हे तंत्रज्ञान आणि रॉकेट बनविण्यासाठी कित्येक कोटी डॉलर खर्च केले आणि पृथ्वीपासून चंद्राकडे अवघ्या ४ दिवसांत हे देश आपलं यान पाठवू शकलेले आहेत. मग असं असताना भारताने हा मार्ग का निवडला नाही? असा प्रश्न आपल्या मनात येऊ शकतो. तर त्यासाठी आपण भारताने वेगळा मार्ग का निवडला हे समजून घेऊ.

भारतात आजही अवकाश क्षेत्राकडे पांढरा हत्ती असं बघणारे अनेक लोक आहेत. 'चंद्रावर जाण्यापेक्षा तेवढ्या पैशांतून गरिबांचे कल्याण करता आलं असतं' असा सूर आजही प्रत्येक मोहिमेनंतर लावला जातो. कारण गरिबांना सगळं फुकट देण्याची वाईट सवय आपण लावलेली आहे. असो. तर मुद्दा असा आहे की, एखाद्या अवकाश मोहिमेसाठी देण्यात येणाऱ्या पैशांवर आजही बंधन आहेत. मग कमी खर्चात चंद्रावर जायचं असेल तर थोडा लांबचा पण स्वस्त असा मार्ग निवडणं हाच पर्याय इस्रोकडे होता. वर लिहिलं तसं गुरुत्वाकर्षण ही एक खूप मोठी शक्ती आहे. तिचा वापर करून आपण यान पाठवू शकतो हे इस्रोने ओळखलेलं होतं. स्वस्त आणि सुरक्षित पद्धतीने यान चंद्रावर नेण्यासाठी इसरोने स्लिंग शॉट किंवा ज्याला 'गोफण पद्धती' म्हणतात त्याचा वापर केलेला आहे. या पद्धतीत तुमच्या यानाला पृथ्वीचं गुरुत्वाकर्षण भेदण्याची शक्ती खुद्द पृथ्वीचं गुरुत्वाकर्षण देते. त्यामुळे जास्त इंधन नेण्याची गरज भासत नाही. कमी शक्तिशाली रॉकेटच्या साह्याने सुद्धा आपण अपेक्षित वेग गाठून अंतराळात जाऊ शकतो.

शेतातील पिकांवर आलेली पाखरं उडवण्यासाठी गोफणीचा वापर केला जातो. यात गोफण अतिशय वेगात गोल फिरवली जाते. गोफणीच्या वेगामुळे आणि त्यातून निर्माण झालेल्या सेंट्रिफ्युगल फोर्स (केंद्रापसारक शक्ती) मुळे त्यातील दगड अतिशय वेगात दूरवर भिरकावला जातो. अशाच पद्धतीने इस्रोने आपलं चंद्रयान ३ हे पृथ्वीच्या लंब गोलाकार कक्षेत आपल्या रॉकेटच्या साह्याने प्रक्षेपित केलं. पृथ्वी ज्या वेगाने स्वतःभोवती फिरते त्या वेगाचा फायदा उचलत जेव्हा यान पृथ्वीच्या अगदी जवळ येते तेव्हा त्याची इंजिनं काही वेळासाठी प्रज्वलित केली जातात. या प्रज्वलनामुळे यानाचा वेग थोडा वाढतो; पण पृथ्वी भोवती कक्षेत फिरताना तिच्या वेगाचा फायदा घेत यानाचा वेग कित्येक पटीने वाढला जातो. यान अजून दूरवर फेकलं जाते. आपण असं म्हणू की, त्याची लंबगोलाकार कक्षा वाढत जाते. जितके वेळा यान पृथ्वी भोवती घिरट्या घालेल तितके वेळा त्याचा वेग वाढत जातो. एक क्षण असा येतो की, जेव्हा यान पृथ्वीचं गुरुत्वाकर्षण भेदण्याचा वेग म्हणजेच ४०,००० किलोमीटर / तास प्राप्त करते. आता गरज असते ती गोफण सोडण्याची. इतका वेळ गोलाकार फिरवून यानाला एक शेवटचा धक्का लागतो. तो दिला की यान पृथ्वी पासून कायमसाठी अंतराळात भिरकावलं जाते. यालाच तांत्रिक भाषेत ट्रान्स-लूनर इंजेक्शन (TLI) म्हणतात.

चंद्रयान ३ ला आत्तापर्यंत ५ वेळा अशा पद्धतीने योग्य वेळी इंजिन प्रज्वलित करून अतिशय लंबगोलाकार

कक्षेत प्रक्षेपित करण्यात आलेलं आहे. शेवटच्या मॅन्युव्हर मधून आता त्याची कक्षा १,२७,६०९ किलोमीटर द २३६ किलोमीटर अशी झालेली आहे. याचा अर्थ चंद्रयान ३ आता पृथ्वीपासून जास्तीत जास्त जवळ २३६ किलोमीटरवर असते, तर सगळ्यात लांब १,२७,६०९ किलोमीटर अंतरावर जाते. हे अंतर कापताना त्याचा वेग ४०,००० किलोमीटर / तासच्या जवळपास पोहचलेला आहे. आता पृथ्वीचं गुरुत्वाकर्षण त्याला पृथ्वीपासून लांब जाण्यासाठी लागणारा वेग देते आहे. साधारण १ ऑगस्ट २०२३ ला इसरो ट्रान्स-लूनर इंजेक्शन (TLI) म्हणजेच गोफणीतून दगड दूर भिरकावून देईल. याचा अर्थ चंद्रयान ३ एक तारखेला पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाला भेदून चंद्राकडे फेकलं जाईल. चंद्राकडे जाता जाता ते आपली दिशा उलट करील.

वर लिहिलं तसं चंद्राच्या गुरुरुत्वाकर्षणच्या ताकदीत बंदिस्त होण्यासाठी चंद्रयान ३ चा वेग ७८५० किलोमीटर / तास इतका कमी होणं अपेक्षित आहे. त्यासाठीच उलट झालेलं चंद्रयान ३ आता उलट दिशेने आपली इंजिन्स प्रज्वलित करील. एका अर्थी ही इंजिन्स ब्रेक लावण्याचं काम करतील. इंजिनं किती वेळ प्रज्वलित करायची याचं गणित चंद्रयान ३ ला आधीच फीड केलं गेलं आहे. एकदा का वेग अपेक्षित इतका कमी झाला, की चंद्राच्या गुरुत्वाकर्षणामुळे ते त्याच्या भोवती परिवलन करायला सुरवात करील. पृथ्वीवर जसा वेग आणि कक्षा वाढवण्यासाठी मॅन्युव्हर केले गेले त्याच्या अगदी विरुद्ध वेग आणि कक्षा कमी करण्यासाठी चंद्राच्या कक्षेत मॅन्युव्हर केले जातील. चंद्रयान ३ मग १०० किलोमीटर द १०० किलोमीटरच्या गोलाकार कक्षेत आलं की विक्रम लॅण्डरचा पुढला प्रवास सुरू होईल.

आता यामुळे जरी भारताला आणि पर्यायाने इस्रोला अंतराळात कसरती कराव्या लागल्या आणि चाराचे चाळीस दिवस झाले तरी मोहिमेच्या उद्दिष्टांवर अथवा वैज्ञानिकांच्या तांत्रिक उपलब्धीवर काहीच फरक पडणार नाही. पण खूप फरक पडेल तो मोहिमेच्या खर्चावर. आज भारताची चंद्रयान मोहीम जगातील सगळ्यात स्वस्त चंद्र मोहीम आहे. ती इस्रोने केलेल्या जुगाडांमुळेच. भले आपल्याला ४० दिवस लागतील पण चंद्रावर जाऊन भारताला स्पर्धा करायची नाही अथवा कोणत्याही स्पर्धेत भाग घ्यायचा नाही. उलट भारत अशा ठिकाणी चंद्रयान ३ उतरवतो आहे ज्याठिकाणी आजवर कोणीच गेलेलं नाही, न कोणी आपले झेंडे गाडलेले आहेत. इस्रोने निवडलेली जागा अनेक कारणांसाठी विशेष आहे. चंद्राचा दक्षिण ध्रुव आजवर उपेक्षित आहे. तिकडे नक्की काय आहे याचे अमेरिकासह जगातील सर्व वैज्ञानिकांना कुतूहल आहे. कारण चंद्राच्या कित्येक बिलियन वर्षांच्या इतिहासात आजवर तिकडे काय आहे हे गुलदस्त्यात आहे.

अमेरिका, रशिया आणि चीन जरी ४ दिवसांत तिकडे पोहोचले, अमेरिकेने आपले १२ अंतराळवीर चंद्रावर उतरवले असले, तरी जे त्यांना जमलं नाही ते भारताच्या चंद्रयान १ मोहिमेने करून दाखवलेलं आहे. चंद्रावर पाणी शोधण्याचा मान इस्रोच्या या मोहिमेला मिळालेला आहे. तेव्हा चंद्रयान ३ येत्या काही दिवसांत चंद्राच्या कोणत्या रहस्यांची उकल करते ते बघणं जास्ती महत्त्वाचं आहे. त्यामुळे ४० दिवसांचा प्रवास हा कित्येक बिलियन वर्षांची रहस्य उलगडणारा असेल याबद्दल माझ्या मनात शंका नाही. तेव्हा ते ४ दिवसांत गेले आणि आपण ४० दिवसांत याचा ऊहापोह करण्यापेक्षा ४० दिवसांनी काय उलगडणार आहे याचा विचार प्रत्येक भारतीयाने करायला हवा. इस्रोची ही मोहीम यशस्वी होईल याबद्दल माझ्या मनात शंका नाही. तूर्तास व्हाट्स अप युनिव्हर्सिटी वर येणाऱ्या अशा फॉरवर्डस्ना त्यांची जागा दाखवा. जय हिंद!!!

**– विनीत वर्तक**
ज्येष्ठ संशोधक
(त्यांच्या ब्लॉगपोस्टवरून साभार)

भव्य विचार हा सुगंधासारखा असतो; तो पसरवावा लागत नाही; आपोआप पसरतो.

# नमो सदा श्री नृसिंहसरस्वती महाराज
## (भाग – २)

*श्री दत्तसंप्रदायात श्री नृसिंहसरस्वती महाराज यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यांच्या भक्तांना त्यांच्या विषयीचे अनुभव एकूणच जीवन जगताना उत्तमरित्या येतात. अशा ह्या व्यक्तिमत्त्वाविषयीची माहिती सर्वांनाच प्रेरणादायी ठरेल... – संपादक*

श्री गुरूचरित्र या दत्तसंप्रदायाच्या अति महत्त्वाच्या धर्मग्रंथात गाणगापूर महात्म्य तर आलेलेच आहे, परंतु सोबतच येथील विविध स्थळं व इतर गोष्टींची माहिती वर्णिलेली आढळते. उदाहरणार्थ, श्री गुरूचरित्रात येथील एका औदुंबर वृक्षाविषयीचे वर्णन आहे. असे म्हटले जाते की, श्री नृसिंहसरस्वतींनीं एका श्री नरहरी नावाच्या ब्राह्मणाला एका वाळून गेलेल्या औदुंबर वृक्षास पाणी घालण्यास सांगितले. त्यानुसार श्री नरहरी ब्राह्मणाने त्या वाळून गेलेल्या वृक्षास पाणी घालण्यास सुरुवात केली व त्या झाडाला पालवी फुटून हिरवेगार झाले. दत्तभक्त असे मानतात की, श्री गुरूचरित्राच्या चाळीसाव्या अध्यायात ज्या औदुंबर वृक्षाचे वर्णन येते तो येथे आहे.

संगमावर स्नान करून वर जातानाच्या मार्गावर एक औदुंबर वृक्ष आढळतो. या औदुंबराखाली श्रद्धाळू दत्तभक्त श्री गुरूचरित्र या दत्तसंप्रदायींच्या दृष्टीने वेदांप्रमाणे पवित्र असणाऱ्या ग्रंथांचे पारायण करताना आढळतात. या ठिकाणी विद्येची व बुद्धीची देवता श्री गणेशाची मूर्ती व भगवंताच्या पादुका आहेत. भाविकांमध्ये अशी मान्यता आहे की, या औदुंबरास अकरा लक्ष एकवीस हजार एकशे आठ प्रदक्षिणा घातल्याने विविध व्याधींपासून मुक्ती मिळते व पुत्रप्राप्ती होते. गाणगापुरातील अजून एक महत्त्वाचे स्थळ म्हणजे ‘भस्माचा डोंगर’ हे होय. येथे अनेक दत्त भक्तांनी व मुनींनी तपश्चर्या व ध्यानधारणा केलेली आहे. त्यामुळे हे स्थळ अतिशय पवित्र मानले जाते व भाविक मोठ्या भक्तिभावाने येथील विभूती आपल्या सोबत घेऊन जात असतात. येथील भस्माविषयीची अशी कथा सांगितली जाते की, अनेक वर्षांपूर्वी भगवान परशुरामाने जगद्‌कल्याणासाठी यज्ञ केले होते व त्या यज्ञांतील उरलेली राख म्हणजेच हा भस्माचा डोंगर होय. येथील भस्म घरी घेऊन जाणे म्हणजे साक्षात दत्तात्रेयांचा प्रसाद घेऊन जाणे होय असे भक्त म्हणतात.

गाणगापुरातील वातावरण सदासर्वदा भक्तीमंगलमय असते. येथे अनेक उत्सव साजरे केले जातात. श्री नृसिंहसरस्वती म्हणजे संपूर्ण जगाचे गुरू. भारतीय संस्कृतीत गुरू–शिष्य परंपरेला फार महत्त्व आहे. गुरू आपल्या उपदेशातून व आचरणातून शिष्यांना ज्ञान देत असतो व विविध विद्या शिकवत असतो. विश्वामित्र–श्री राम परशूराम–भीष्म, परशूराम–कर्ण, द्रोणाचार्य –अर्जुन, सांदिपनी–श्रीकृष्ण या गुरू–शिष्यांच्या जोड्या प्रसिद्ध आहेत. गुरूला भारतीय संस्कृतीत आदराचे स्थान तर आहेच, परंतु त्याला ईश्वरच्या प्रती ज्याप्रमाणे श्रद्धा असते त्या श्रद्धेने पूजले जाते. गुरू आपणास योग्य ते मार्गदर्शन करून संकटसमयी मदत करतो व आपल्याला संकटातून बाहेर काढतो. गुरूंच्या अगाढ ज्ञानाचा प्रसार शिष्याने ग्रहण करून आपले जीवन सुखमय, समृद्ध व समाधानी करून घ्यावयाचे असते. तद्‌नंतर माता–पित्या प्रतीचे ऋण व समाजऋण फेडावयाचे असते. सरते शेवटी आपल्या कौटुंबिक व सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडून अनंतात विलीन होऊन मोक्षप्राप्ती करून घ्यावयाची असते. असो. तर आपणास असे म्हणावयाचे होते की, गुरू म्हणजे एका अर्थाने इहलोकीचा परमेश्वरच होय. यामुळेच दत्तसंप्रदायात अवतार पुरुषांना गुरू म्हटलेले आहे व या संप्रदायात देखील गुरू–शिष्य परंपरेला

फारच महत्त्व आहे. उदाहरणच द्यावयाचे झाल्यास येथे आपणास नाथ संप्रदायातील गोरक्षनाथां नंतर कानिफनाथ, चरफटीनाथ, इत्यादी गुरू व शिष्यांची नावे सांगता येतील. नाथ संप्रदायाला दत्तसंप्रदायाचाच एक भाग अनेकजण मानत असतात. गोरक्षनाथ दत्तभक्तच होते अशी मान्यता आहे. त्यामुळेच गिरनार येथील गोरक्षनाथांच्या स्थळाला दत्तभक्त आवर्जून जात असतात. भारतीय संस्कृतीत ज्या गुरूंचे नाव अतिशय पूजनीय आहे ते म्हणजे गुरू व्यास होत. व्यासांनी महाभारत कथन केले व श्री गणेशाने ते खंड न पाडता एका रात्रीत लिहून काढले अशी कथा सांगितली जाते. विद्येची देवता गणपतीने मुळात अशी गळच घातली होती म्हणतात की, व्यासांनी खंड न पडू देता महाभारत सांगितले तरच तो ते लिहिल. तर अशा या गुरूश्रेष्ठ व्यासांची गुरूपौर्णिमेच्या दिवशी पूजा केली जाते. तसेच हिंदू धर्मात अतिशय पवित्र मानल्या गेलेल्या श्रावण मासात अनेक भक्त श्री गुरूचरित्राचे पारायण करतात. येथील मठामध्ये असणाऱ्या शिवलिंगावर अभिषेक केला जातो. गणेश चतुर्थीच्या दिवशी श्रीपाद श्रीवल्लभ स्वामींचा जन्मोत्सव उत्साहाने साजरा केला जातो. दसऱ्याच्या दिवशी संध्याकाळी श्री कल्लेश्वर मंदिरात पालखी जाते. आश्विन वद्य द्वादशी हा गाणगापुरातील महत्त्वाचा सण मानला जातो. कारण या दिवशी श्री नृसिंहसरस्वती स्वामींची अवतार समाप्ती झाली होती असे म्हणतात. श्री नृसिंहसरस्वती स्वामींचा अवतार संपविण्याचा काळ समीप आल्यानंतर त्यांनी भीमा नदीतून प्रस्थान केले; म्हणजेच ते गुप्त झाले. परंतु एका ठिकाणी त्यांनी भक्तांना पुन्हा एकदा दर्शन दिले. या ठिकाणाला 'निर्गुण पादुका' असे म्हणतात. या निर्गुण पादुकांचे वैशिष्ट्य म्हणजे यांना पाणी न लावता फक्त अष्टगंध आणि केशराचा लेप लावतात.

गाणापुरात श्री नृसिंहसरस्वती महाराज दिवस मध्यान्हावर असताना म्हणजेच साधारणतः दुपारच्या बारा ते साडे-बाराच्या वेळी माधुकरी मागत असत. त्यामुळे आजही श्रद्धाळू दत्तभक्त गाणगापुरास गेल्यावर भिक्षा मागून अन्नग्रहण करतात. तसेच, भाविकांना अन्नदान करताना आढळतात. नरक चतुर्दशी हा हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा दिवस आहे. दिवाळीच्या दरम्यान हा दिवस येतो. या दिवशी अभ्यंगस्नान केले जाते. गाणगापुरात देखील भक्तगण नरक चतुर्दशीला येथील अष्टतीर्थांमध्ये आंघोळ करतात. कार्तिक पौर्णिमा हा दिवस सुद्धा दत्तसंप्रदायात महत्त्वपूर्ण ठरतो. या पौर्णिमेला दत्तात्रेयांची पालखी संगमावर नेली जाते. मार्गशीर्ष शुद्ध चतुर्दशीला म्हणजेच दत्तजयंतीला दुपारी बारा वाजता येथे मोठा उत्सव साजरा केला जातो. दत्तात्रेयांचे दुसरे महत्त्वाचे स्थान नांदेड जिल्ह्यातील माहूर येथे देखील दत्तजयंती उत्सव उत्साहाने साजरा केला जातो. एवढेच नव्हे तर, भारतभरातील दत्तात्रेयांच्या सर्वच पवित्र ठिकाणांवर, दत्तमंदिरांमध्ये व स्वामी समर्थांच्या मठांवर दत्तजयंती साजरी केली जाते.

खालील ओळी दर्शवितात की, गाणगापूर हे श्री नृसिंहसरस्वतींच्या निवासाचे स्थान होते व त्यामुळे दत्तभक्तांची ही पंढरी ठरते.

प्रसिद्ध आमुचा गुरू जगी। नृसिंह सरस्वती विख्यात।।
ज्याचे स्थान गाणगापूर। अमरजा संगम भीमातीर।।

शेकडो वर्षांपासून दत्तभक्तांची या पवित्र स्थळी येण्याची रीघ असते. भगवान दत्तात्रेयांच्या प्रत्येक भक्ताला आयुष्यात एकदा तरी गाणापूरला येऊन श्री नृहसिंहसरस्वतींच्या येथील लीलांची व साक्षात्काराची अनुभूती घेण्याची इच्छा असते.

**– सहा. प्राध्यापक सुभाष गंगाराम शिंदे**
उपप्राचार्य व इतिहास विभागप्रमुख
विप्रमंचे जोशी-बेडेकर (स्वायत्त), महाविद्यालय,
ठाणे (पश्चिम)- ४००६०६
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email : subhashinscotland@gmail.com

●●●

---

दुसऱ्याचे अनुभव जाणून घेणे हाही एक अनुभवच असतो !

# भारतातील पोलीश निर्वासित

*५ जुलै २०२२ ला पोलंडची राजधानी वॉर्सात 'Remembering the good Maharajas' कार्यक्रम पोलंडमधील भारतीय दूतावासाने खास आयोजित केला आहे. त्याच्याशी असलेल्या भारतीय संबंधाबद्दल प्रस्तुत लेखात लंडन येथील संकेत कुलकर्णी यांनी प्रकाश टाकला आहे*

युरोपातलं दुसरं महायुद्ध. ह्या युद्धाला सुरुवात झाली ती नाझी जर्मनीने सप्टेंबर १९३९ मध्ये त्यांचं सैन्य पोलंडची राजधानी वॉर्सात घुसवून. नाझी जर्मनीला पहिल्या महायुद्धातल्या तहान्वये पोलंडकडे असलेला त्यांचा भूभाग आणि विशेषतः डँझिग बंदर हवं होतं. नाझी जर्मनीच्या आक्रमणानंतर १६-१७ दिवसांतच पूर्वेकडून सोव्हिएट रशियाने पोलंड गिळंकृत करायला सुरुवात केली. १९२० साली पोलंड - सोव्हिएट रशिया युद्धात जोसेफ पिलसुडस्कीच्या नेतृत्वाखाली लढणाऱ्या २० डिव्हिजन पोलीश सैन्याने रशियाच्या सुमारे ७० डिव्हिजन सैन्याचा पुरता पराभव केला होता. सोव्हिएट रशियाला जमेल तितका पोलंड गिळंकृत करून त्याचा बदला घ्यायचा होता. पश्चिमेकडून नाझी जर्मनी आणि पूर्वेकडून सोव्हिएट रशिया - मधल्यामधे पोलंडचा विनाश सुरू झाला. नाझी जर्मनी आणि सोव्हिएट रशिया ह्यांच्यामध्ये अनाक्रमणाचा करार आधीच झालेला होता. त्यामुळे त्यांना एकमेकांची भीती नव्हती. नाझी जर्मनी पोलीश ज्यूंना सरळ छळछावण्यात पाठवत होते, तर सोव्हिएट रशिया कब्जा केलेल्या पोलीश भूभागातून पकडलेल्या बायका-पुरुष मुलंबाळं सर्वांना सायबेरिया किंवा कझाकस्तानातल्या श्रमछावण्यात पाठवत होते. पोलीश सैन्याची संपूर्ण वाताहत झाली होती. बरेचसे सैन्य पश्चिमेकडे पळून जाऊन मित्रसैन्यात सामील झाले होते. पोलीश वैमानिक वगैरे ब्रिटनच्या रॉयल एअर फोर्स मधून लढत होते.

नाझी जर्मनीची विजयी मुसंडी सुरूच होती. त्याच उन्मादात १९४१ मध्ये हिटलरने सोव्हिएट रशियासोबतचा अनाक्रमणाचा करार मोडून तिथे सैन्य घुसवलं. आता अचानक परिस्थिती बदलली. नाझी जर्मनीविरुद्ध सोव्हिएट रशिया मित्रराष्ट्रांच्या कंपूत आला. ह्या कंपूत पोलीश सैन्य आणि अधिकारी आधीपासूनच होते. त्यांना सोव्हिएट रशियाच्या ह्या कुप्रसिद्ध श्रमछावण्यांबद्दल माहीत होतेच. ह्या सक्तीच्या श्रमछावण्यात लोकांकडून रेल्वेलाइन टाकणे, खाणीत काम करणे, जंगलतोड वगैरे कामं सक्तीने करवून घेतली जात. लोकांसाठी अन्न, पाणी, वस्त्र, निवाऱ्याच्याही सोयी नसत. पसरलेली रोगराई आणि औषधोपचारांचा संपूर्ण अभाव. त्यात रशियन थंडी. लाखो लोक मृत्यूमुखी पडत. पण त्याने काहीच फरक पडत नसे कारण नवे 'मजूर' लगेचच आणले जात.



पण सोव्हिएट रशिया मित्रराष्ट्रांमध्ये आल्यावर पोलंडने ब्रिटनवर दबाव आणायला सुरुवात केली की, ह्या सोव्हिएट श्रमछावण्या बंद व्हाव्यात आणि तिथले लोक - विशेषतः बायकामुले - ब्रिटनच्या भारतीय

साम्राज्यात सुरक्षित ठिकाणी हलवले जावेत. नाझी जर्मनीने सोव्हिएट रशियाची वर्ष दोन वर्षात बरीच वाताहत केली होती. त्यामुळे त्यांना ह्याबाबतीत इतर मित्रराष्ट्रांच्या मागणीसमोर झुकावेच लागले. त्यांनी ह्या श्रमछावण्यातल्या लोकांना 'सार्वत्रिक माफी' जाहीर केली. माफी तर झाली पण आता हे लोक पुन्हा पोलंडमध्ये जाणं शक्य नव्हतं कारण तिथे युद्ध सुरू होतं. सोव्हिएट रशियाने जाहीर तर केली होती सार्वत्रिक माफी, पण त्यांनी सगळ्यांची सुटका लगेच केली नव्हती. कारण त्यांना भीती होती की, ही मंडळी सरसकट बाहेर पडली तर श्रमछावण्यांतील खरी परिस्थिती आणि रशियाची कृष्णकृत्ये लगेच जगासमोर आली असती. (तीपण नाझी जर्मनीपेक्षा काही कमी नव्हती!) त्यामुळे सोव्हिएट रशियाने ह्या लोकांची सुटका करण्यात बरीच चालढकल केली. ह्यातले काही नाममात्र लोक मुक्त तर झाले, पण ह्यांची कोणतीच वाहतुकीची किंवा प्रवासाची वगैरे सोय केली नव्हती. हालअपेष्टा सोसत आणि सोव्हिएट प्रदेशांतून (कझाकस्तान – उझबेकीस्तान – तुर्कमेनिस्तान वगैरे) मजलदरमजल करत ही पोलीश मंडळी कशीबशी दक्षिणेला इराणमध्ये येऊन पोहोचली. इथून पुढे काय?

१९३९ पासूनच भारतातला पोलीश राजदूतावास कार्यरत होता. जी मंडळी ह्या श्रमछावण्यातून वाचली होती त्या निर्वासितांची तात्पुरती सोय करायचे प्रयत्न हा पोलीश राजदूतावास करत होता. त्यांच्या लोकांना इराणमधून बाहेर काढायचे प्रयत्न सुरू होते. काही पोलीश मंडळी माश्शाद – झाहेदान – क्वेट्टा मार्गे कराचिला पोहोचली तर काही मंडळी बंदर अहवाझमार्गे समुद्रमार्गाने कराचिला पोहोचली. कराची तेव्हा भारताचा भाग होता. ह्या मंडळींची सोय ब्रिटिशांनी आधीच ठरवून टाकलेली होती. काही मंडळी गेली गुजरातेतल्या जामनागर संस्थानातल्या बालाछडी नावाच्या गावांत तर काही मंडळी मुंबई – पाचगणी मार्गे पुढे आली कोल्हापूर संस्थानातल्या वळीवडे गावांत!

हे कसं काय झालं? पोलंडचे भारतातील राजदूत डॉ. बानसिनस्बी १९४१ पासून भारतामध्ये पोलीश निर्वासितांना वसवलं जावं ह्यासाठी ब्रिटिश सरकारकडे पाठपुरावा करीत होते. १९४२ च्या सप्टेंबरमध्ये निर्णय होऊन भारतात ५००० ते ६००० पोलीश निर्वासितांची सोय करण्यात यावी असं भारताच्या व्हाईसरायला कळविण्यात आलं. जामनगरच्या महाराजांनी ५०० निर्वासितांची सोय करायची तयारी दाखवली. उरलेल्या निर्वासितांसाठी ब्रिटिश सरकार जागा पहात होते. जागेसाठी अटी बऱ्याच होत्या. जागा मोक्याची हवी होती. हवापाणी उत्तम असलेली. स्टेशनजवळची पण रिकामी. आणि अन्नधान्य दूधदुभत्याची ददात नसलेली. शेवटी कोल्हापूरनजीक वळीवडे गावाची जागा ठरली. सुमारे २५० एकर जमिनीत नवी वस्ती वसवली गेली. मुंबईच्या हिंदुस्तान कन्स्ट्रक्शन कंपनीला हे कंत्राट देण्यात आलं. १२ घरांचा एक ब्लॉक असे १४० ब्लॉक्स, ७५० स्नानगृहे, १ स्टोअररूम, स्टाफसाठी १० ब्लॉक्स – सोबतच पोस्ट ऑफीस, थिएटर, चर्च, खेळाची मैदानं हे सगळं प्लॅन्ड होतं. मुलामुलींच्या शिक्षणासाठी तीन बालवाड्या, तीन प्राथमिक शाळा, तीन माध्यमिक शाळा, एक हायस्कूल, आणि एक व्यावसायिक शिक्षणाचे हायस्कूल सुरू करण्यात आलं होतं. १०२८ विद्यार्थी प्राथमिक शाळेत आणि ४५३ विद्यार्थी हायस्कूलमध्ये अपेक्षित होते. सोबत वळीवड्यात २०० खाटांचं सुसज्ज हॉस्पिटल असणार होतं ज्यात ७-८ डॉक्टर्स व १६ नर्सेस आरोग्यसेवेसाठी नियुक्त केल्या होत्या. हे सर्व बांधकाम वर्षभराच्या आत होऊन ८ जानेवारी १९४४ रोजी ह्या कँपचं उद्घाटनही झालं.

सोव्हिएट श्रमछावण्यातून सुटून आलेल्या पोलीश बायकामुलांसाठी तर हा स्वर्ग होता. त्यांना वळीवड्यात जीवाची भीती नव्हती. खाणंपिणं योग्य आणि वेळेवर मिळत होतं. कसलीही ददात नव्हती. १९४८ पर्यंत ही

(पृष्ठ क्र. ११ वर)

# पाणतिपाता वेरमणी सिक्खापदं समादियामि ।

*पर्यावरण या विषयात सर्व सृष्टीचे महत्त्व आहे. त्यात प्राणी, पक्षी, जलचर इ. सर्व सजीवांची महत्त्वाची भूमिका असते. हे सर्व आपण डोळे उघडे ठेवून समजून घेतले पाहिजे. त्यासाठी कायदे देखील आहेत. या दिवसाच्या संदर्भातील भगवान बुद्ध यांचा डोळसपणा अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. – संपादक*

'प्राणीमात्रावर दया करणे वा त्यांना त्रास न देणे आणि सर्व सजीवांवर प्रेम करणे, करुणाभाव दाखवणे' अशा अर्थाचा हा बुद्धाचा शील सर्व जगाने मान्य केला. बुद्धा व्यतिरिक्त अनेक धर्म संस्थापकांनी आणि धर्मग्रथांनी देखील प्राणीमात्रांवर प्रेम करण्याची शिकवण दिली. समाज आजही हे शील दोन्ही हात जोडून म्हणत असला तरी सत्यस्थिती व वस्तुस्थिती मात्र एकदमच विचलित आणि हळहळवून थक्क करणारी आहे. प्राणी आणि निसर्ग यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी ही शासनाची आणि प्रत्येक व्यक्तीची आहे. 'प्राणी आणि इतर सजीव जर या पृथ्वीतलावर जगले तरच मनुष्य जगेल' एवढे साधे गणित मनुष्यालाच समजून नये हे त्याच्या 'मनुष्यपणा'ला शोभत नाही !

जगभरात वाढणाऱ्या प्राणी हत्या आणि विलुप्त होत चाललेल्या अनेक प्राण्यांच्या जमाती, आपल्यासाठी चांगले संकेत नाही. विकासाच्या नावाखाली कापली जाणारी झाडी, तोडली जाणारी जंगले, खोदले जाणारे डोंगर एक दिवस या पृथ्वीवर मोठा तांडव मांडेल याच भीतीने १९७२ मध्ये स्टोकहोल्म इथे पर्यावरण संदर्भात आतंरराष्ट्रीय परिषद भरविण्यात आली. १९९२ मध्ये रिओ डे जनेरिओ, ब्राझील इथे अर्थ समिट झाली. यानंतरही वेळोवेळी आंतरराष्ट्रीय पातळीवर निसर्गाचा समतोल राखला जावा म्हणनू परिषदा झाल्या आहेत. या परिषदेने आंतरराष्ट्रीय स्तरावर प्राणी, वन्यजीव, जंगले, डोंगरे, नदी अशा निसर्गाच्या सर्वच घटकांच्या संरक्षणाचा आढावा घेतला. भारतीय संविधानाने देखील निसर्ग, प्राणी, जंगल, वन्यजीवन यांच्या संरक्षणाची तरतूद त्याच्या भाग ४ मध्ये करून ठेवली आहे. त्यापैकी एक-दोन महत्त्वाच्या कायद्यांच्या तरतुदी वरील शील पाळण्याच्या दृष्टीने समजून घेणे आवश्यक आहे. भारतीय संविधानाच्या काही अनुच्छेदाच्या व्यतिरिक्त प्राण्यावर होणाऱ्या क्रूरतेला आळा घालण्यासाठी Prevention of Cruelty to Animal Rights Act, 1960, आणि The Wildlife Protection Act, 1972 हे कायदे संसदेने पारित केले. या व्यतिरिक्तही अनेक कायदे आहेत, भारतीय दंड संहिता, महाराष्ट्र पोलिस अधिनियम यामध्ये देखील प्राण्यांविरोधातील गुन्ह्यासाठी शिक्षेची काही तरतूद आहे.

Federation of Indian Animal Protection Organisations (FIAPO) आणि All Creatures Great and Small (ACGS) यांनी प्रसिद्ध केलेल्या अहवालाप्रमाणे २०१० ते २०२० या दहा वर्षांत भारतामध्ये ४,९३,९१० प्राण्याविरोधात लहान मोठे गुन्हे करण्यात आले. अमेरिका आणि चीन मध्ये तर प्राण्यावरील अत्याचाराला काही सीमाच नाही. जगभरात प्रत्येक मिनिटाला एका प्राण्याला गंभीर स्वरूपाच्या क्रूरतेला सामोरे जावे लागते. ही क्रूरता त्यांच्या जीव घेण्याइतपत असते. युएस मध्ये दरवर्षी १० दशलक्ष प्राण्यांवर अत्याचार केले जातात. त्यात पक्षी, मासे, माकडे आणि डुक्कर, कुत्रे यांचा समावेश होतो. प्रयोगशाळांमध्ये वैज्ञानिक चाचणीसाठी जे काही प्राण्यांसोबत होते तो अभ्यासाचा भाग असल्यामुळे क्रूरतेच्या व्याखेत येत नाही, कदाचित हीपण एक प्रकारची

क्रूरताच असेल. पाळीव प्राणी, शेती उपयोगी प्राणी यांच्यावर त्यांच्याच मालकाकडून होणारे अत्याचारही खूप मोठ्या प्रमाणात आहेत. कुत्री, मांजरी असे सहज दिसणारे प्राणी यांच्यावर जास्त अत्याचार होतो असे दिसते. एका अहवालानुसार, प्राण्यांवर झालेल्या १००० हल्ल्यांच्या गुन्ह्यांपैकी ८२ प्रकरणे लैंगिक शोषणाची, २६६ प्रकरणे खून आणि ४०० हून अधिक प्रकरणे मारहाण, लाथ मारणे, छळ करणे, ॲसिड फेकणे किंवा उकळते पाणी फेकणे अशा हिंसक हल्ल्यांची होती. काही अहवालाप्रमाणे भारतात दररोज सरासरी ५ जनावरे मृत्यूमुखी पडल्याचा अंदाज आहे. परंतु वास्तविक आकडेवारी किमान १० पट जास्त असू शकते, याचा अर्थ दररोज ५० प्राण्यांचा मृत्यू होतो. यामध्ये कत्तलखाने, प्राणीसंग्रहालयं, प्रयोगशाळांमधील प्राण्यांचे मृत्यू आणि अपघात किंवा मानवी निष्काळजीपणामुळे होणाऱ्या मृत्यू यांचा समावेश नाही. थोडक्यात, प्राण्यांवरील अत्याचार किंवा क्रूरता हा तेवढासा गंभीर विषय वाटत नसल्यामुळे त्यावर समाजामध्ये विशेष चर्चा किंवा जागृती होताना दिसत नाही.

'मी प्राणीमात्रांवर प्रेम करेन' एवढेसे बोलून चालत नाही आणि म्हणूनच संसदेत कायदा करून दोषी व्यक्तीला शिक्षा देणे आवश्यक आहे. नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो (NCRB) आपल्या वार्षिक 'क्राइम इन इंडिया (CII)' अहवालाद्वारे देशातील सर्व प्रकारच्या गुन्ह्यांचा अहवाल देत असते. परंतु NCRB 'प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायदा १९६०' या कायद्यांतर्गत नोंदवलेल्या गुन्ह्यांसाठी विशिष्ट अहवाल प्रदान करत नसल्यामुळे प्रत्येक वर्षी प्राण्यांवर झालेल्या क्रूरतेसंबंधी किती गुन्ह्यांची नोंद झाली याची खात्रीलायक माहिती मिळत नाही. पण तरीदेखील रोज होणाऱ्या घटना, वर्तमानपत्रातील बातम्या, सोशल मीडियावरील माहितीच्या आधारे हे मान्यच करावे लागते की, प्राण्यांच्या विरोधात मोठ्या प्रमाणात क्रूरता होत असते. २०१६ मध्ये संसदेत दिल्या गेलेल्या माहितीनुसार २०१२-२०१५ या काळामध्ये या कायद्यांतर्गत २४३५३ प्रकरणे नोंदवण्यात आली होती. १९६० मध्ये पारित केलेल्या या कायद्याचा उद्देश, 'प्राण्यांना उगीचच वेदना किंवा यातना देण्यास प्रतिबंध करण्यासाठी आणि त्या प्रयोजनार्थ प्राण्यांना क्रूरतेने वागविण्याशी संबंधित कायद्याचे विशोधन करणे' असा सांगितला आहे. १८७२ चा वन्यजीव संरक्षण कायदा प्राण्यांच्या काही प्रजातींचे रक्षण व्हावे म्हणून त्यांना मारणाऱ्या व्यक्तीस कठोर शिक्षेची तरतूद करतो. अभिनेता सलमान खानची काळविटाच्या शिकारीची केस आपल्याला माहीतच असेल. १९६०च्या कायद्याने भारतीय जीव जंतूकल्याण मंडळाची स्थापना केली, प्राण्यांच्या कल्याणासाठी आणि संरक्षणासाठी पारित केलेल्या कायद्याची योग्य अंमलबजावणी करणे आणि या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेस मदत करणे असा या मंडळाचा उद्देश आहे. प्राण्यांवरील क्रूरता व त्यासाठीच्या शिक्षेची तरतूद या कायद्यात आहे. मुद्दा अंमलबजावणीचा व त्यापेक्षा समाज जागृतीचा आहे. वन्यजीव संरक्षक कायद्याअंतर्गत शिक्षा थोड्याफार प्रमाणात जास्त असली तरी किती दोषी सापडतात हाही विषय आहेच. शिकार, वन्यजीवांना अनेक कारणांसाठी विकणे किंवा मारणे असे प्रकार सर्रास चालतात. हत्तीदंत, वाघ, बिबळ्याची कातडी, गेंड्याची शिंगे, विविध प्रकारच्या सर्पांची तस्करी असे अनेक अपराध दिवसाढवळ्या होत असतात. मानवी समाजात वावरणाऱ्या प्राण्यांचीही अशीच गत आहे.

प्राणीमित्र व प्राण्यांच्या देखभाल करणाऱ्या संस्था म्हणूनच सरकारकडे यासंबंधित कायद्यात सुधारांची मागणी करत आहेत. अनेक संस्था वारंवार न्यायालयात दाद मागतात. तमिळनाडूमधील जल्लीकट्टू असो की इतर ठिकाणी असलेल्या प्राण्यांच्या शर्यती, न्यायालयाच्या हस्तक्षेपानेच बंद झालेल्या दिसतात. मागील ७२ वर्षांत न्यायालयाने अनेक निकालांच्या माध्यमातून प्राण्यांवरील अत्याचार कमी करण्यासाठी काम केले आहे. १९५८ मधील गाईच्या कत्तलीच्या विरोधातील निर्णयापासून ते संपूर्ण गोवंश हत्याबंदी कायद्यापर्यंतचा हा प्रवास

न्यायालयाच्या मदतीमुळे शक्य झाला आहे. पण हा फक्त गाईचा किंवा गोवंशचा मुद्दा नाही, तर एकूण प्राण्यांवर होणाऱ्या क्रूरतेचा मुद्दा आहे. यामध्ये काहीही दुमत असता कामा नये की, अनेक कायदे आणि अनेक न्यायनिर्णय असून देखील प्राण्यांवरील क्रूरता कमी झालेली नाही. हे सांगत असताना आपणास हेहि मान्य केले पाहिजे की, प्राण्यांच्या हल्ल्यात अनेक माणसेही जखमी होतात, पण त्याचे प्रमाण फार नगण्य आहे.

फक्त कायदा बनवून प्राण्यांवरील अत्याचार किंवा क्रूरता कमी होऊ शकत नाही. यासाठी आहे त्या कायद्याची कठोर अंमलबजावणी होणेही आवश्यक आहे. शालेय शिक्षणात याचा समावेश झाल्यास प्राण्यांविषयीचे भय कमी होऊन त्यातून नकळतपणे होणारे अत्याचार थांबू शकतील. स्थानिक संस्थेस त्यांच्या विभागात प्राण्यांची संख्या कशी नियंत्रित राहील (विशेषतः कुत्र्यांची) यासाठी उपाययोजना करणेही आवश्यक आहे. The Animal Birth Control (Dogs) Rules, 2001 तसा अधिकार प्रदान करत असल्यामुळे असे केल्यास त्याचा परिणाम सकारात्मक होऊ शकतो.

प्राण्यांवरील क्रूरता आणि अत्याचार संपुष्टात आणण्याची जबाबदारी ही प्रत्येक नागरिकाची आहे. भगवान बुद्धांच्या पचंशीलापैकी एक 'पाणतिपाता वेरमणी सिक्खापदं समादियामि' मनुष्यास प्राणीमात्रांवर प्रेम करण्यास सांगते. एखाद्या मनुष्यास प्राण्यांवर प्रेम करणे शक्य नसेल तर किमान त्याने प्राण्यांवर क्रोध व्यक्त करू नये, त्यास त्रास देऊ नये, याही गोष्टीने चांगला परिणाम होईल. धर्म प्राणीमात्रांवर प्रेम करण्यास शिकवितो आणि कायदा प्राण्यांवर अत्याचार आणि क्रूरता करण्यास प्रतिबंध करतो. दोहोंपैकी कोणतेही एक केल्यास आपला उद्देश साध्य होईल.

**– प्रा. विनोद एच वाघ**
विद्या प्रसारक मंडळाचे टिएमसी विधी महाविद्यालय
ठाणे

(पृष्ठ क्र. ८ वरून – **भारतातील पोलीश निर्वासित**)

सुमारे १०००० मंडळी कोल्हापुरात राहिली. तेथील लोकांशी मिळूनमिसळून वागली. आयुष्यभराच्या आठवणी घेऊन पुन्हा मायदेशी पोलंडला गेली. काही मुलींनी कोल्हापूरकर मुलांशी लग्नं केली आणि संसार बसवले. आयुष्यभर सुखात नांदल्या.

आज हे सगळं लिहायची गरज काय? तर बालाछडी आणि वळीवड्यात राहून गेलेली ही बायकामुलं फार थोडी शिल्लक आहेत पण ते आजही भारताचे उपकार स्मरतात. कृतज्ञता बाळगतात. जेव्हा जगात कोणी आसरा दिला नाही तेव्हा भारताने त्यांना आसरा दिला. मदत केली. ही मंडळी आज जगभरात पांगलेली आहेत पण परवा ५ जुलैला पोलंडची राजधानी वॉर्सात येणार आहेत – 'Remembering the good Maharajas' कार्यक्रमासाठी. हा कार्यक्रम पोलंडमधील भारतीय दूतावासाने खास आयोजित केला आहे. जामनगर आणि कोल्हापूर गाद्यांचा सत्कार करण्यासाठी. जामनगरचे राजेसाहेब प्रकृती अस्वास्थ्यामुळे येणार नाहीयेत पण त्यांचा प्रतिनिधी येतोय. आपले कोल्हापूरचे युवराज संभाजीराजे आणि संयोगिताराजे वॉर्सात येणार आहेत. हा एक अप्रतिम सोहळा असेल हे नक्की!

टीप : ह्या कार्यक्रमाच्या तयारीसाठी बिटिश लायब्ररीतून मी काही कागद आणि फोटोज पोलंडमधल्या भारतीय राजदूतावासाला पाठवले होते.

**– संकेत कुलकर्णी**
लंडन


•••

केवळ ज्ञान असून उपयोग नाही, ते कसं आणि केव्हा वापरायचं याचंही ज्ञान हवं.

# प्रा. गं. बा. सरदार : विशुद्ध समाजप्रबोधक

*मराठी वाङ्मय विश्वात एक अभ्यासू समीक्षक, सहृदयी व्यक्ती, ज्यांची तर्कनिष्ठा वादातीत होती असे एक जाज्वल्य व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रा.गं.बा.सरदार हे होत. त्यांच्या सामाजिक बांधिलकीबाबत त्यांच्याविषयी अंशत: - संपादक*

''साहित्यिकानं सामाजिक बांधिलकी मानावी असं जेव्हा मी म्हणतो, तेव्हा ही बांधिलकी त्यांनी स्वयंप्रेरणेने मानली पाहिजे असंच मला सुचवायचं असतं. तसं पाहिलं तर समाजनिरपेक्ष व्यक्तीची कल्पनाच करता येत नाही. आपण सामाजिक संबंधांचे वेगवेगळे पदर बाजूला केल्यावर स्वयंसिद्ध व्यक्ती उरतेच कुठे? व्यक्ती आणि समाज यांना परस्परांपासून अलग करण्याचा प्रयत्न फोल आहे, अशास्त्रीय आहे. लेखकाचं व्यक्तित्व ज्या समाजात घडतं त्याच्या स्वाभाविक ऋणानुबंधाचं भान सुटणं हे निकोपपणाचे लक्षण नव्हे. दुसरं असं की, सामाजिक कर्तव्याची जाणीव निकोप प्रवृत्तीच्या माणसावर लादण्याचं वस्तुत: कारणच पडत नाही. सामाजिक जाणीव साहित्यात कमी झाली तर साहित्याचा कसही कमी ठरतो असं मला वाटतं. कोणत्याही साहित्यात विचाराला एक स्थान असतं. विचार, भावना, कल्पना यांचे व्यापार एकमेकांपासून विलग करता येत नाहीत. व्यक्तीचं सारं जीवनच सामाजिकतेनं वेधलेलं, व्यापलेलं असतं असं म्हणता येईल. म्हणूनच साहित्य आणि समाज यांचे परस्परसंबंध अतूट आहेत असं मी समजतो. सामाजिक बांधिलकी मानणं म्हणजे लेखकाच्या मूलभूत स्वातंत्र्याच्या छेद देण्यासारखं आहे असं ज्यांना वाटतं ते व्यक्तीला समाजापासून कृत्रिमपणानं बाजूला काढण्याचा प्रयत्न करतात.''




डॉ. निर्मलकुमार फडकुले यांच्याबरोबर झालेल्या प्रश्नोत्तरातून

संदर्भ : 'प्रबोधनातील पाऊलखुणा' - 'एक वेध' पृष्ठ १४०

महाराष्ट्राच्या विचार अवकाशात आपल्या शैलीदार आणि ठाशीव मांडणीमुळे प्रतिष्ठा मिळविलेल्या चिंतक-लेखकांची एक मोठी दीपमाळ झगमगत होती. त्या सर्वांच्या लेखन-भाषणांत स्वमताचे आग्रही प्रतिपादन असे पण भिन्न मताचा दुस्वास नसे, त्याविरुद्ध अढी नसे. त्याच्या खंडणासाठी तर्काच्या तलवारी पाजळलेल्या असत, पण स्व-मतातील उणीवा मान्य करताना उपसलेलं खड्ग शांत करण्यासाठी म्यानाचं मुखही मोकळं असे.

सामाजिक वावर अशक्य करून टाकणारी बहिष्काराची कुप्रथा हटविण्यासाठी जागरण-प्रबोधन झालं, त्याची शिष्टसंमती दूर करण्याचे निकराचे प्रयत्न झाले आणि तसं झालंही. पण दुर्दैवाने बहिष्कृतीची

बाधा विचारक्षेत्रात आपली पाळंमुळं रुजवू लागली. वैचारिक दहशतवाद पोसू लागला. ह्या फुफाटणाऱ्या पाळामुळांनी समाजाची भूमी दुभंगून टाकली. दोन नवे वर्ग उभे केले. खरं तर वर्गभास निर्माण केले. पुरोगामी आणि प्रतिगामी! तसे पाहता हे केवळ दोन शब्द आहेत. त्यातही केवळ प्रथमार्धच भिन्न आहे. पण वैचारिक क्षेत्रात ही दोन वर्ण असावेत तशी भेदनास्त्रं आहेत. वेचून वेचून प्रतिगामी असा शिक्का ठोकून विशिष्ट विचारसमर्थकांना विचारकुसाबाहेर हद्दपार करण्याचा एक नवा पायंडा पडला. एका नव्या विटाळाची परिभाषा ओरखड्यासारखी लिहिली गेली.

आणि म्हणूनच अशा या काळात प्रा. गं. बा. सरदार यांचं स्मरण करावंसं वाटलं. सरदारांची ओळख पुरोगामी विचारवंत अशीच आहे. पण त्यांच्या वाणीत वा लेखनात तसा विखार नव्हता. विचारांचे खंडणमंडण होते पण खुनशी वैरभाव नव्हता.

समाजातील साहित्यिकांत, कलावंतांत प्रतिगामी-पुरोगामी विभागणी करण्यासाठी एक निकष सामाजिक बांधिलकी हा असे. ती इतकी संदिग्ध असे की ती कोण जपतो आणि कोण नाही हे ठरवणे अवघड व्हावे. पण तीही एक सोयच असावी.

पुढे भारतीय, राष्ट्रीय मूल्यांना.. विषयांना केंद्र मानून वैचारिक क्षेत्रात जे ठामपणे उभे राहिले, आजही अधिक व्यापक जनाधार मिळवत आहेत अशा सर्वांनी सामाजिक न्याय, सौहार्द, संवेदनशीलता, समाजातील आंतरिक एकात्म्य असे काही विषय साहित्य-संस्कृती क्षेत्रात चर्चापटलावर आणले. त्याला वाढता प्रतिसाद मिळू लागला. 'समरसता' ही जीवननिष्ठा होतीच पण ते कला-साहित्यमूल्य म्हणून मांडले. आनंद यादवांसारख्या ज्येष्ठ साहित्यिकाने आपल्या भाषणातून त्याचा विस्तार केला.

आज आरंभी उद्धृत केलेलं प्रा. सरदारांचे सामाजिक बांधिलकीविषयीचे चिंतन वाचताना मला ती 'समरसता' मूल्याचीच बीजाक्षरे वाटली. ती बाहेरून ओढायचे आवरण नसून तेच जीवनाचे जणू अस्तर असावे असं सर्वार्थाने सहज, अंगभूत मूल्य असल्याचं त्यांच्या मांडणीतून जाणवलं.

विचारवंत, समाजचिंतकाचे शब्द अशी अर्थवलये पुढे पुढे नेत असतात, व्यापक करीत असतानाच नाळ मुळांशी घट्ट करतात.

आज प्रा. गं. बा. सरदार या शैलीदार, ठाशीव मांडणी करणाऱ्या समाजचिंतकाचा स्मृतिदिन.

त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन.

**- प्रमोद वसंत बापट**
०१, प्राजक्त, बी - ४, अशोकवन,
बोरिवली पूर्व, मुंबई : ४०००६६
भ्रमणध्वनी : ९८२१९७९८७१

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहे.**

**- संपादक**

# कंबोडिया: अंकोर वाट

*कंबोडियातील अंग्कोर वाट जगातील सर्वात मोठ्या मंदिराचे कौतुक सर्वांनाच आहे. याची रचना वैशिष्ट्ये, इतिहास इ. कुतूहलात्मक माहिती प्रस्तुत लेखात आहे – संपादक*

कंबोडियाच्या घनदाट अरण्यात एक फ्रेंच शास्त्रज्ञ वेगवेगळी फुलपाखरे, कीटक यांचा शोध घेत होता. फुलपाखरे शोधत तो जंगलात बराच आतपर्यंत शिरला. कंबोडियावर त्या काळी फ्रेंच लोकांची सत्ता होती. वर्ष होते १८६०. त्या काळोख्या दाट जंगलात पुढे पाऊल ठेवण्यासाठी त्याला झुडपे, वेली तोडतच पुढे जावे लागत होते. किर्र जंगलात शोधता शोधता अचानक त्याला समोर असे काही दिसले की, त्याचे डोळे आश्चर्याने विस्फारले! क्षणभर त्याचा स्वतःच्या डोळयांवर विश्वास बसेना!



समोर होती, त्याच्या नजरेच्या कवेत मावत नव्हती, एवढी प्रचंड इमारत! संपूर्ण दगडात बांधलेली! जंगलामध्ये लुप्त! शेकडो वर्षांपासून मानवी हस्तक्षेपासून दूर, महाकाय झाडांनी वेढलेली.

अवाढव्य, महाप्रचंड आणि अदभूत!

खरेतरं, अविश्वसनीय!

त्याने त्याच्या आयुष्यात एवढी महाप्रचंड इमारत पाहिली नव्हती. त्यानेच काय, संपूर्ण युरोप खंडात कोणीही अशी इमारत पाहिली नव्हती. पाहणार तरी कशी? कारण एवढ्या प्रचंड आकाराची इमारत संपूर्ण युरोपमध्ये नव्हतीच! कोणी बांधण्याचा विचारही करू शकत नव्हते. आधुनिक तंत्रज्ञानात स्वत:ला खूप प्रगत समजणाऱ्या संपूर्ण युरोपला आणि जगाला थक्क करणारी ही घटना होती!

हे एक मंदिर होते.

नाव होते, 'अंग्कोर वाट'! एक मंदिर!

भारतापासून ५००० किलोमीटर दूर देशातील एक हिंदू मंदिर!

आजमितीसही, 'अंग्कोर वाट' जगातले सर्वात मोठे प्रार्थना स्थळ आहे! जगात कुठल्याही धर्माचे एवढे मोठे प्रार्थनास्थळ नाही. एवढे अवाढव्य प्रार्थनास्थळ त्यापूर्वी ना कोणी बांधले होते, ना कोणी नंतर बांधू शकला!

एका कंबोडियन हिंदू सम्राटाने हे बांधले होते १२व्या शतकात! इसवीसन ११५०च्या सुमारास!

मात्र, १५व्या शतकापासून काही अनाकलनीय कारणाने ते जंगलात लुप्त झाले होते. मंदिरातले बोटावर मोजण्याएवढे बौद्ध भिक्षू आणि मंदिर परिसरात राहणारे काही आदिवासी खेडूत वगळता, शेकडो किलोमीटर अंतरात लोकवस्तीही नव्हती...

५०० एकर एवढ्या भव्य क्षेत्रफळावर बांधलेले ‘अंग्कोर वाट’ मंदिर आहे, भगवान विष्णूचे!

पश्चिममुखी असलेले हे मंदिर किती भव्य असावे? मुख्य प्रवेशद्वारापासून गाभाऱ्यापर्यंत पोहोचायलाच ३ ते ४ किलोमीटर चालावे लागते! मंदिराच्या सभोवती एक आयताकृती कालवा आहे, त्याचीच एकत्रित लांबी ५.५ किलोमीटर आहे! ४ मीटर खोल असलेल्या या कालव्याची रुंदी आहे २५० मीटर म्हणजे पाव किलोमीटर! हा कालवा ओलांडूनच मंदिराच्या पहिल्या प्रवेशद्वारापाशी पोहोचता येते! फक्त पहिल्या प्रवेशद्वारापाशी, मंदिरात नाही! पुढे अशी अजून दोन प्रवेशद्वारे ओलांडूनच आपण मुख्य मंदिराजवळ येतो!

तत्कालीन कंबोडियन हिंदू राजा (दुसऱ्या) सूर्यवर्मनने हे भव्यदिव्य मंदिर घडवले, तेव्हा कालांतराने ही वास्तू जगातल्या सात आश्चर्यांपैकी मानली जाईल, असे त्याला वाटलेही नसेल!

‘अंग्कोर वाट’पेक्षा आकाराने निम्म्या वा त्याहूनही छोटे असणाऱ्या युरोपातले ‘कॅथेड्रल्स’ बांधायला १५० ते २०० वर्षे लागली, काहींना ३००! दुसऱ्या सुर्यवर्मनने हे मंदिर घडवले ते फक्त ३० ते ३५ वर्षांत! लाखो कंबोडियन नागरिक, कामगार, कारागीर, मूर्तीकार, निष्णात अभियंते, वास्तूरचनाकार, शेकडो हत्ती, हजारो बैलगाड्या, तराफे या मंदिरासाठी ३५ वर्षे अविरत झटत होते!

४८ लाख टनांपेक्षा जास्त दगड लागले, ही वास्तू पूर्ण करण्यासाठी. बरं, हा दगडही मंदिराच्या जवळपास उपलब्ध नव्हता, तो आणावा लागला दूर असलेला महेंद्र नामक पर्वत फोडून. रस्तामार्गे हे जड दगड वाहाणे अशक्य होते. नदीतून आणावे म्हटले तर अशी नदीही या बांधकाम स्थानापासून दूर होती. अंतर जवळपास ८०-९० किलोमीटर होत होते. एवढे वजनदार आणि एवढ्या संख्येने दगड वाहून आणने, महाकठीण काम.

दुसऱ्या सुर्यवर्मनकडे या अवाढव्य महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी लागणाऱ्या सगळ्या गोष्टी होत्या. वैभवशाली राज्य असल्याने पैशांचा तर महापूर होता, नव्हता तो फक्त वेळ! त्याला त्याच्या जीवनकालातचं हे मंदिर पूर्ण करायचे होते. मग या राजाच्या बुद्धिमान अभियंत्यांनी महेंद्र पर्वतापासून मंदिराच्या स्थानापर्यंत महाप्रचंड असे कालव्यांचे जाळे उभारले!

सारेच अवाढव्य!

डोंगरातून कापलेले दगड तराफ्याने कालव्यांमार्गे बांधकामाच्या ठिकाणी आणले जायचे, तिथे त्यांना जरुरीप्रमाणे कापले जायचे. एकमेकांवर घासून हे कठीण दगड चारही बाजूने सपाट केले जायचे आणि मग बांधकामात वापरले जायचे! दगडाचे असे किती तुकडे एकूण बांधकामासाठी लागले, याची मोजदाद अशक्य!

या साऱ्या बांधकामासाठी ना सिमेंट, ना काँक्रीट, ना लोखंड! सगळे बांधकाम दगडावर दगड रचून साकारायचे म्हणजे अतिशय कठीण आणि जोखमीचे काम!

आतमध्ये दगडी भित्तिचित्रे असलेल्या दोन-दोन किलोमीटर लांब दगडी ‘गॅलरीज’ आहेत (यांचे छप्परसुद्धा दगडाचेच). त्यांना आधार द्यायला जे असंख्य खांब आहेत, ते सगळे इतके काटेकोरपणे सरळ रांगेत की तसूभरही फरक नाही.

एक मिलिमीटर सुद्धा मागे पुढे नाही! आजकालच्या ‘लेझर’ किरणांच्या तोडीस तोड तंत्रज्ञान! बांधकामातले कौशल्य अचंबित करते! अतिशय अवघड असे हे तंत्रज्ञान. या तंत्रज्ञानाविषयी फारशी माहिती आता उपलब्ध नाही, पण हे लोक फारच प्रगत तंत्रज्ञान वापरत होते, यात शंकाच नाही!

अशा ३ गॅलरीज आहेत. ह्या ज्या लांबलचक गॅलरीज आहेत, त्यांनी संपूर्ण मंदिराला विळखा घातलाय.

२५० मीटरचा कालवा ओलांडून आले की, एक प्रवेशद्वार. ते ओलांडून एक-दीड किलोमीटर पार केल्यावर दुसरे प्रवेशद्वार. हे प्रवेशद्वार पहिल्या आयताकृती महाप्रचंड गॅलरीचा भाग आहे. ते पार करून थोड्या उंचावर दुसरी आयताकार गॅलरी सुरू होते. ती पार करून मग तिसरी आणि मग मुख्य मंदिराची सुरुवात!

या सगळ्या गॅलरीज एकापेक्षा एक उंचावर आहेत. एका पिरॅमिड सारखी रचना. सगळ्यात वर मंदिराचे आभाळात घुसलेले ५ कळस.... एक मुख्य कळस मध्यभागी आणि चार उपदिशांना उंचीने थोडे कमी असलेले चार कळस. सुरुवातीला ओलांडून यायच्या कालव्यापासून उंची मोजली, तर मुख्य कळसाची उंची २३३ मीटर आहे! म्हणजेचं ७०-८० मजली उंच इमारती एवढी!

हे मंदिर पूर्ण झाले आणि आजूबाजूला लोकवस्ती झाली, तेव्हा लंडनची लोकसंख्या होती ३०,००० आणि 'अंग्कोर'ची लोकसंख्या होती दहा लाख!

युरोपात औद्योगिक क्रांती होण्याअगोदरचे जगातले सर्वात मोठे शहर!

बांधकामाच्या कलेत आणि शास्त्रात प्रावीण्य असलेले, हिंदू संस्कृतीचा अभिमान बाळगणारे, एक सुसंस्कृत शहर! (हे भरभराटीला आलेले शहर, मंदिर पुढच्या दोन-तिनशे वर्षांत, ओसाड पडेल, असे तेव्हा कोणाला स्वप्नातही वाटले नसेल...)

आजही भल्या भल्या अभियंत्यांना तोंडात बोटे घालायला लावणाऱ्या या मंदिराची रचना, बांधणी त्याकाळी कशी केली असेल या विचाराने थक्क व्हायला होते! या गॅलरीजमध्ये अडीच मीटर उंच आणि एकत्रित साडे-चार किलोमीटर लांब अशी दगडात कोरलेली असंख्य आणि अखंड भित्तिचित्रे आहेत! पौराणिक कथा, रामायण, महाभारत आणि दुसऱ्या सूर्यवर्मनची कारकिर्द दगडात कोरलीयं!

मंदिरात जवळपास १५०० अप्सरा कोरल्या आहेत, प्रत्येक अप्सरा वेगळी! एकीसारखी दुसरी नाही. सारख्या वाटल्या आणि निरखून पाहिले तर त्यांचे पैंजण तरी वेगळे असेल, बाजूबंद तरी वेगळा असेल, हार वा कंगण तरी वेगळे असेल वा केशभूषा!

अविश्वसनीय आणि अतर्क्य!

ही सगळी भित्तिचित्रे बघायची म्हटली तर चार-पाच किलोमीटरची पायपीट आलीच! हे सारे कोरीवकाम दगडी भिंतीवर तीन ते चार इंच खोलीत! हे कोरणे तर अवघडच, पण असा एवढा मोठा 'कॅनव्हास' तयार करणेही सोपे नव्हते. एकावर एक अशा दहा-बारा शिळा चढवून भिंत बनवलेली. दोन दगडांमध्ये हवासुद्धा जाऊ नये इतके एकमेकांवर घासायचे, नंतर पूर्ण भिंत नाजूक छिन्नी-हातोड्याने एकसंध बनवायची आणि मूर्तीकारांच्या सुपूर्द करायची.

मग या कलाकारांचे कोरायचे काम सुरू! भित्तिचित्रे कोरताना एखाद्यावेळी हातोडा जोरात पडला, एखादी चूक झालीच, तर संपूर्ण भिंतच परत रचायची! परत सपाट करायची आणि परत पहिल्यापासून कोरायला सुरुवात करायची! असे अवाढव्य मंदिर बांधायची कल्पना करणे, असंख्य अडचणींवर मात करून ती कल्पना प्रत्यक्षात आणणे, हे सारेच अफलातून!

असे म्हणतात की, या मंदिराच्या उभारणीसाठी दुसऱ्या सूर्यवर्मनच्या राज्यातील प्रत्येक कुटूंबातील एकजण तरी सहभागी होता. धन्य ती सारीच मंडळी!

हे असले काही भव्यदिव्य पाहिले की हात आपोआप जोडले जातात. भारतीयांच्या तत्कालीन स्थापत्यज्ञानाचा, तंत्रज्ञानाचा अभिमान वाटतो आणि आपण किती महान संस्कृतीत जन्माला आलोय याची जाणीव होते!

संकलन

**- डॉ. प्रशांत धर्माधिकारी**

---

काळ हे दु:खावरील सर्वात मोठे औषध आहे; अश्रुंनी भरलेले डोळेही काळ पुसून टाकतो !

# लता मंगेशकरः स्वर जैसे कल्लोळ अमृताचे !

*लतादीदींबद्दल काय, काय सांगावं? स्वर, आत्मीयता, अलौकिक जाणीव, दैवी आकलन शक्ती पुष्कळ, पुष्कळ आणि अमर्याद पुष्कळच. ज्या आपल्या पिढीने त्यांना प्रत्यक्ष ऐकलं ते आपण भाग्यशाली. अशा दीदींबद्दल - संपादक*

लताचा स्वर कसा ? लताच्या स्वरासारखा !
जैसी अमृताची चवी निवडिजे ।
तरी अमृताची सारखी म्हणिजे ।
तैसे ज्ञान हे उपमिजे। ज्ञानेसेचि ।।

ज्ञान हे ज्ञानासारखं, अमृत हे अमृतासारखं, तसं तिचा स्वर तिच्याचसारखा !

लताचा दिव्यस्वर माउलींनी ऐकला असता तर दैवी स्वराची लक्षणं आपल्याला सांगितली असती...

स्वर शुद्ध हवा. कापरासारखा अंतर्बाह्य निर्मळ, शुचिर्भूत! 'आंग मन जैसे कापूराचे'

स्वराकार कसा हवा तर 'वसंतागमीची वाटोळी मोगरी जैसी!' मोगऱ्याची कळी गुंफलेली असो वा मोकळी, तितकीच टपोरी व शुभ्रसुगंधी असते, तसा दाणेदार स्वर हवा !

'काश्मीरांचे स्वयंभ, कां रत्नबीजा निघाले कोंभ' असं ज्याचं तेज, आणि 'जैसा निर्वातीचा दीपु, सर्वथा नेणे कंपु!' अशी ज्याची स्थिरता, असा असतो दैवी स्वर !

'अतींद्रिय परि भोगवीन इंद्रियाकरवी' - या मर्त्य, लौकिक जगातच मी तुम्हाला अलौकिकाचा प्रत्यय देईन, हे असतं त्याचं ब्रीद !

तिच्या गायनाची विपुलता, विविधता कशी ?

जैसे ऋतुपतींचे द्वार । वनश्री निरंतर । वोळगे फळभा । लावण्येसी ।।



फलपुष्पांच्या समृद्धीनं भारावलेली वनश्री वसंताच्या दारी निरंतर तिष्ठावी, तशी .. आणि या स्वरवैभवाच्या भोक्तृत्वाचे अधिकारी कोण ?

जैसी कमळकळिका जालेपणे। हृदयीचिया मकरंदा राखो नेणे । दे राया रंका पारणे । आमोदाचे ।।

पूर्णविकसित कमलिनी आपल्या हृदयातून उमटणारे दिव्य गंधलोट मुक्तपणे उधळते ! त्यावर रावापासून रंकापर्यंत सर्वांचा सारखाच अधिकार असतो !

लताबाईंचा कोणता गानभाव सर्वश्रेष्ठ मानायचा ? भक्ती-शृंगार-विरह-आनंद-प्रेम-दुःख सर्व रसांमधली त्यांची गाणी तितकीच उत्कट आहेत. पण त्यांनी गायलेल्या ज्ञानेश्वरांच्या विराण्यांमधे या सर्व रसांचं एकत्व अनुभवता येतं! स्वतः लताबाईही म्हणत की, 'मला ज्ञानदेवांच्या रचना गाताना पवित्र दिव्यानंद मिळतो.'

देववाणीपासून दूर आलेल्या सामान्यजनांना गीतेच्या अमृतापासून वंचित रहावं लागू नये म्हणून ज्ञानदेव गीतेला मराठीत आणतात. 'गीतार्थे विश्वंभरू । मांडू

आनंदाचे आवारू ।।' असं आवाहन करतात. काळाचं चक्र फिरत रहातं नि मग ज्ञानदेवही आम्हाला समजेनासे होतात. तेव्हा मग अमृतकंठी, मातृहृदयी नि ईश्वरशरण अशी स्वरलता पुढं सरसावते. विस्मरणात गेलेला ज्ञानाचा दिव्य मकरंद पुन्हा युक्तीनं आपल्याला चाखवते ! गगनावेरी गेलेल्या या स्वरवेलीला धरून आपणही आपल्या लौकिक जगापासून थोडे उंच उठतो. हृदयनाथांच्या दैवदत्त प्रतिभेनं ज्ञानदेवांच्या रचनांना नवसंजीवनी मिळते आणि श्रवणभक्तीची एक सोपी नि सुरेल पायवाट खुली होते.

मराठी भाषेचं हे अलौकिक देशिकार लेणं स्वरलेणं बनून मराठीजनांच्या कानात डोलू लागतं !

'पुढां स्नेह पाझरे । मागां चालती अक्षरें । शब्द पाठी अवतरे। कृपा आधीं ।।'

तसे लताच्या गाण्यात स्वर, शब्द नंतर पोचतात. आधी पाझरतो, पुढे धावत येऊन आपल्याला कवेत घेतो तो भाव ! ही भावात्मकता हे त्यांचं सर्वात मोठं बलस्थान. या भावनिर्मितीकरता कोणत्याही कृत्रिम स्वरमेळाचा आधार लताबाईंना कधी घ्यावा लागला नाही. अर्थाच्या पलीकडचा भावही या स्वरांनी अचूकपणे आपल्यापर्यंत पोचवला.

'का भिंगारि दीपु ठेविला । बाहेरि फांके । तैसे हृदयिचेंनि ज्ञानें । जिये देही उमटति चिन्हे ।। तशा स्वरातून आतल्या वृत्ती झळकत राहिल्या.

ज्ञानदेवांचे 'साच आणि मवाळ । मितुले आणि रसाळ । शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ।।' असे शब्द पोचवण्याकरता तसाच अमृताचा कल्लोळ असणारा कंठ असायला हवा. 'अवचिता परिमळु, झुळकला अळुमाळु, मी म्हणे गोपाळु, आला गे माये!' हे नितांत कोमल शब्द त्यातल्या उच्च ईश्वरी भावनेसह लताबाई स्वरात सहज गुंफतात.

'तो सावळा सुंदरू, कासे पीतांबरू' असं त्या उच्च रवानं सांगतात तेव्हा त्या झळझळीत स्वरांच्या तेजात न्हालेला लावण्याचा पुतळा आपल्याला याचि देहि याचि डोळा अक्षरशः दिसतो. आणि 'अजि सोनियाचा दिनु, वर्षे अमृताचा घनु, हरि पाहिला रे !' असा आनंदसोहळा साजरा करताना आपलं मनही लहानग्या मुक्तेसारखं टाळ्या पिटत हरि पाहिला रे, हरि पाहिला रे! म्हणून थुईथुई नाचू लागतं !

शब्दावरचं आवरण आपल्या स्वरांनी हलकेच दूर करून त्या अनायासपणे गहन अर्थाशी आपली भेट घडवतात. शब्दांच्या उच्चारणाचंही तसंच. 'परिमळु विद्रुदु रे भ्रमरा' असो किंवा 'अवघेचि झाले देहब्रह्म' म्हणत असताना शब्दांच्या उच्चाराकडे आपलं लक्षही न जाता त्यांचा अचूक उच्चार आपल्या मनावर नकळत बिंबला गेलाय. अत्यंत शुद्ध, स्पष्ट, पण आघात न करता, ठासून केलेले शब्दोच्चार नाहीत तर सहज, सुघट, स्वच्छ नि डौलदार असे उच्चार !

गोरख कल्याणसारखा अनवट राग आणि मोगरा फुलला मोगरा फुलला सारखे उत्कट शब्द, त्याला लताच्या स्वरांचा स्पर्श होतो अन पहाता पहाता काव्यरसाचा वेलू गगनावर पोचतो ! घनु वाजे घुणघुणा वारा वाहे रुणझुणा ऐकताना वाऱ्याची शीतल झुळूक अंगावरून जावी असे स्वर लहरत येतात ..

''भवतारकु हा कान्हा वेगी भेटवा का'' म्हणतानाची ती स्वरातली व्याकुळ उतावीळ, देवकीनंदनाशिवाय हे चांदणं-चांफा-चंदन काहीच मला आवडत नाही म्हणताना नाऽऽवडे हो म्हणतानाची लाडिक तक्रार ! ''तुम्ही गातसा सुस्वरे'' म्हणताना कोकिळाच्या तानेसारखाच सर्रकन स्वर वरती झेपावतो आणि दर्पणात मला पहायला गेले तरी तिथं तोच तो दिसतोय अशी माझी अवस्था त्यानं केली हे सांगताना एक अगतिक

शरण भाव येतो ! 'मी' पणाचा याहून सुंदर विलय कुठे अनुभवायला मिळणार?

''अरे, अरे, ज्ञाना झालासि पावन - तुझे तुज ज्ञान कळो आले'' हे इतकं सरळ, सहज आणि गोड वाटतं की, पुन्हा ज्ञानदेवांच्याच पंक्ती आठवतात. हे सांगणं कसं आहे तर -

''पिकलिया सुखाचा परिमळु । कां निवालिया अमृताचा कल्लोळु । तैसा कोवळा आणि सरळु । बोलु बोलिला ।।''

पक्व झालेल्या फळाचा दर्वळ सुटावा किंवा अमृताच्या शीतल लहरी याव्यात तसं स्वाभाविक, निर्मळ कोवळं सांगणं. आणि मग मधेच तो एक शून्य प्रहर येतो ! ''दीपकी दीपक मावळल्या ज्योती, घरभरी वाती शून्य झाल्या !'' त्या शून्य मधे एकाचवेळी जी रिक्तता आणि पूर्णता जाणवते ती क्षणार्धात दाखवण्याची लतादीदींची क्षमता केवळ अद्‌भुत अशी आहे. त्या एका शब्दात 'पूर्णमदं पूर्णमिदं' असा अनुभव येतो.

'वाचे बरवें कवित्त्व । कवित्वी बरवें रसिकत्त्व। रसिकत्त्वी परतत्त्व । स्पर्शु जैसा ।।' हा परतत्त्वाचा स्पर्श त्या स्वराला होता, म्हणूनच आपले रसिकत्वही बरवें झाले !

आपल्यासारख्या सामान्य श्रोत्यांना बसल्याजागी ईश्वराची अनुभूती देणारं हे स्वरसामर्थ्य दैवी आहे, पूर्वसुकृताचं फळ आहे असं जाणवतं.पण या दैवदत्त सामर्थ्याला अपार कष्टांची, प्रयत्नांची जोड होती.

'तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमांची वीरा । पूजा केली होय अपारा । तोषालागी ।।' अशी स्वकर्माची पूजा तिनं मनोभावे मांडली. आपल्या अंतर्जाणिवेनं ज्ञानदेवांच्या शब्दांची स्वरमूर्त घडवली. पण या गानकर्तृत्त्वाचाही लता मंगेशकर नावाच्या देहाशी संबंध केवळ उपचारापुरता होता ! स्वत्वाचा विलय इतका, की स्वतःच्या श्वासाचीही खूण कुठल्या गीतात तिनं मागं सोडलेली नाही ! परमेश्वराकडून जे आलं ते आपल्या 'मी'पणाची भेसळ न करता तिनं आपल्यापर्यंत पोचवलं.

ज्ञानेश्वरांच्या अत्यंत सुघट रचनांच्या अंतर्भागात लताच्या स्वरांची दीपकळी प्रकाशली, की अर्थाचे कवडसे त्या ज्ञानदीपातून बाहेर फांकू लागतात. स्वराची, अर्थाची, भावभावनांची अनेक बिंब-प्रतिबिंबं डोलू लागतात.

श्रोत्यांना मग अनायासे ज्ञानाची दिवाळी होते ! या स्वरदीपातून जे तेज बाहेर डोकावतं ते केवळ ज्ञानदेवांच्या ज्ञानसाधनेचं वा लतादीदींच्या स्वरसाधनेचं नसतं. ते असतं या दोघांच्याही अंतःकरणातल्या निर्मळ सद्‌भावनेचं प्रस्फुरण !

ज्ञानदेवांचं आयुष्य काय किंवा दीदी म्हणून कोवळ्या खांद्यावर कुटुंबाचा व्यवहाराचा दुनियादारीचा भार पेलणाऱ्या लताचं पूर्वायुष्य काय, असे अमृताचे निर्झर फुटावेत असं सहजसुंदर मुळीच नव्हतं. पण गतायुष्याला त्यांनी 'आक्रोशेवीण क्षमा' केली. आयुष्याची सगळी खारट तुरट चव पोटात घालून हे अमृताचे समुद्र बनले. ''बोलते जे अर्णव पीयूषांचे'' असे झाले! आकाशाएवढं विशाल झालेलं ज्ञानदेवांचं चित्त. पण ते सगळ्या जगाच्या दुःखाचं प्रतिबिंबानं झाकोळलं नाहीय तर प्रकाशलंय! 'विश्वाचे आर्त माझ्या मनी प्रकाशले, अवघेचि झाले देहब्रह्म' हे करुणेतून प्रकटणारं देवत्व किती तरल आणि तरीही किती संयतपणे सुरातून प्रकटलंय.

गाणं गाताना एखादी जागा, एखादा स्वर आर्त वा विव्हल लावणं वेगळं नि संपूर्ण गाणं त्या विकल भावावर तोलणं वेगळं! पैलतिरीच्या काऊच्या हाका ऐकू आल्या आहेत आणि त्यामुळं मनात आनंदाचे कल्लोळ उठले आहेत.

साक्षात पंढरीनाथाच्या भेटीची वेळ जवळ आली आहे असं सांगणारा हा शकुन! त्यातल्या मुक्तीच्या अर्थाची थेट जाणीवही द्यायची नाही, पण त्याला वरवरच्या भोगावस्थेतही रेंगाळू द्यायचं नाही हे ज्ञानेश्वर जसं खुबीनं करतात तितक्याच सहजपणे लताचा स्वर हे काम करून जातो. एका बाजूला मीलनाचा आनंद आणि दुसऱ्या बाजूला निर्वाणाची ओढ असा तोल सांभाळण्याचं अवघड काम हा स्वर लीलया करतो. या रचना ऐकताना 'जैसे अंगाचेनि सुंदरपणें । लेणियासी आंगचि होय लेणें। अलंकारिले कवण कवणे । हे निर्वचेना ।।' अशी अवस्था होते. ज्ञानदेवांचे समृद्ध शब्द, हृदयनाथांची अचूक स्वरयोजना की लताच्या स्वरांचा दिव्यस्पर्श, कशाची ही किमया आहे, हे कोडं आपल्याला सुटत नाही. कुणामुळं कोण सुंदर दिसतंय हे कळेनासं होतं !

सद्गुरुकृपेनं ज्ञानेश्वरीत उसळलेल्या शब्दकल्लोळा-विषयी ज्ञानदेवांनी जे म्हटलं, ते लताच्या अमृत कंठातल्या स्वरकल्लोळालाही अगदी जसंच्या तसं लागू पडतं! हे केवळ कानांनी नाही, तर मनानं, सर्वेंद्रियांनी भोगायचं परिपूर्ण सुख आहे !

'ज्ञानाचे बोलणे। आणि येणे रसाळपणे। आता पुरे कोण म्हणे। आकर्णिता ।।' ज्ञान इतक्या रसाळपणे गाऊन पोचवलं तर श्रोते 'पुरे' कशाला म्हणतील! आपल्याला हा दिव्यकंठ चिरंतनपणे गातच रहायला हवा होता.

'श्रवणसुखाचां मांडवी । विश्व भोगी माधवीं ।' असा तिच्या स्वरमंडपाखाली सदैव फुललेला श्रवणसुखाचा वसंत आपण भोगला.

नव्वदीपार गेलेलं समृद्ध जगणं संपत आलंय अशी जाणीव झाल्यानंतर या गानकोकिळेनं घातलेली साद पैलतीरावर मुरली वाजवत असलेल्या त्याला ऐकू गेली असेल. 'रंगा येई वो' असं म्हणून तिनं त्याला निर्वाणीचं बोलावणं धाडलं असेल.. विठाई, किठाई, कृष्णाई, कान्हाई म्हणून निरनिराळ्या नावानं त्याला हाक मारली असेल.

तुझाच वेध मला लागलाय रे वैकुंठेश्वरा, जगत्पालका आता धावत ये कसा! कटीवरचे कर तसेच असूदेत, रत्नजडित मुकुट नि पीतांबर असाच, असशील तसा ये! तुझ्या कमलनयनांचं ध्यान मला लागलंय. येई वो, रंगा येई वो ! आता या जगात मांडलेला खेळ आवरून ठेवलाय. चल तुझ्या कमरेला खोचून तुझ्या मुरलीला घेऊन चल .. तिथे पैलतीरावर तुझ्या मांडलेल्या खेळाच्या रंगात मला रंगू दे ! तुझी रासलीला अनुभवू दे !

तिच्या या सुरेल आर्त विनवणीनं तो पाघळलाच! येऊन तो आपल्या मुरलीला घेऊन गेला..

'कां सरलेया गीताचा सुमारंभु। न वचे राहवलेपणाचा क्षोभु । भूमी लोळोनि गेलिया अंबु । वोल थारे ।।'

गाण्याचा कार्यक्रम संपला तरी कानात स्वर रेंगाळत रहातात, जमिनीवरचं पाणी वाहून गेलं तरी ओलं मागे रहाते. वारा ओसरला तरी डोल उरतो, कापूर संपला तरी वास मागे उरतो. तसं तिचं स्वरलाघव मागं उरलंय.

तरीही विश्व चालत राहील. 'आचंद्रसूर्य'पर्यंत, काही ना काही स्वरूपात जीवसृष्टी असेल तोवर हा स्वरही पृथ्वीवर असेलच. मग कधीतरी विश्वही नसेल. परत एकदा अथांग पोकळीत निखळ चैतन्य केवळ उरेल.

पण मग त्यालाही परत खेळ मांडावा वाटेल.

तेव्हा या नीरव पोकळीत पुन्हा एकदा जो ओंकार घुमेल, तो तिचाच तर स्वर असेल !

**– विनीता तेलंग**
ज्येष्ठ संशोधक, मुंबई
भ्रमणध्वनी : ९८९०९२८४११

# समकालीन आणि समकालीनत्व...

*डॉ. आनंद कुलकर्णी यांना कवितांची केवळ आवड नव्हे, तर कवितांमधील मर्म उलगडून दाखविण्याची हातोटी अंगभूत लाभलेही आहे. त्यांच्या लेखणीतून 'आस्वादामकता' पाझरतो, हा गुण दुर्मीळ म्हणायला पाहिजे. आता तर त्यांनी विशिष्ट शब्द भेदांतील नेमका अर्थ उलगडणाऱ्या काही शब्दांना भिडण्याची किमया साध्य केली आहे / सुरुवात केली आहे... – संपादक*

समकालीनत्व म्हणजे काय? समकालीन असणं म्हणजे काय? असा प्रश्न मला बऱ्याच वेळा पडलेला आहे. हा प्रश्न दोन्ही पातळीवरचा आहे – अवकाश आणि काळ. तसेच हा प्रश्न दोन्हीही प्रकारचा आहे– ontological आणि epistemological. (आता जरा हे दोन्हीही शब्द सोपे करून सांगतो. समजा गुलाबाचं फुल तोडताना तुमच्या हातात काटा रुतला तर तुम्ही काय कराल? वेदनेने विव्हळाल, काटा काढायचा प्रयत्न कराल. किती दुखतयं, त्रास होतोय, हात हालवता येत नाही याचा विचार कराल. हे झालं ontological- वस्तूजगताशी संबंधित. पण तुम्ही 'काय काटा आहे हा आणि तो मलाच का रुतला? किती काट्याकुट्यांनी भरलंय जग, सुख कुठेच नाही. खरंच सुख दुर्लभ असतं का आणि दु:ख सतत सोबत का असतं?' असा विचार करत असाल आणि सुखदु:खाची संगती लावायचा प्रयत्न करत असाल, तर तुम्ही epistemological होताय. सुखदु:खाची गुणवत्ता शोधताय.) तर मूळ प्रश्न 'समकालीन म्हणजे काय?' असा आहे. यावर बरंच लिहिलं गेलंय. क्रिटिकल थेअरीपुरतं बोलायचं तर, फ्रेडरिश नीत्शेने यावर भाष्य केलं होतं. पुढे अनेक तत्त्वज्ञ/विचारवंतांनी अनेक संदर्भांत contemporary म्हणजे समकालीन या संकल्पनेवर भाष्य केलंय. पण मी सध्या जॉयर्जिओ अगम्बेन (Giorgio Agamben) या प्रख्यात इटालियन तत्त्वज्ञाचं साहित्य वाचतोय. त्याला समकालीन 'मिशेल फुको' म्हणता येईल इतका त्याचा आवाका मोठा आहे आणि मांडणी मूलगामी आहे. Political philosophy हा त्याचा विशेष अभ्यासाचा विषय. पण त्याला शाखीय बंधनं नाहीत. विटेगस्टाइन पासून फुकोपर्यंत त्याचा संचार आहे. तर मुद्दा हा की, काल मी त्याचा 'What Is the Contemporary?' हा अप्रतिम निबंध वाचला. १६ पानांचा हा निबंध 'समकालीन' या संकल्पनेची अतिशय मूलगामी चिकित्सा करतो. सगळ्याच critical theorists ची असते तशी इथेही अंतर्विरोधांनी भरलेली मांडणी आहे, पण अगम्बेनच्या कवितेचं उदाहरण देऊन ही संकल्पना सोपी करून सांगतो. त्याच्यालेखी समकालीन व्यक्ती (म्हणजे विचारवंत) ती असते जी तिच्या काळात राहूनसुद्धा तिच्या काळाच्या प्रकाशाने (म्हणजे त्या काळात घडणाऱ्या तथाकथित प्रगतीने) दिपून न जाता त्या प्रकाशातील सावल्यांचा, त्यातील सहज लक्षात न येणाऱ्या गोष्टींचा शोध घेत राहते. त्याच्याच शब्दांत–

The ones who can call themselves contemporary are only those who do not allow themselves to be blinded by the lights of the century, and so manage to get a glimpse of the shadows of those lights, of their intimate obscurity.


आणि 'समकालीनत्व म्हणजे काय?' आपला आपल्या काळाशी असलेला एकात्म संबंध. अशा संबंधामुळे आपण आपल्या काळाशी सुसंगत राहू. पण

(पृष्ठ क्र. २४ वर)

# स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात रणरागिणी

*स्वातंत्र्यसंग्रामातील रणरागिनी या नुकत्याच प्रकाशित झालेल्या पुस्तकाचे परीक्षण ज्येष्ठ साहित्यिक डॉ. नरेंद्र पाठक यांनी प्रस्तुत लेखात केले आहे - संपादक*

सर्जनशील लेखन जसे महत्त्वाचे असते, तद्वतच ऐतिहासिक लेखन अथवा चरित्रात्मक लेखनही महत्त्वाचे असते. 'थोर क्रांतिकारकांची चरित्रं, ऐतिहासिक व्यक्तिचरित्र लिहिणाऱ्या लेखकांना आम्ही साहित्यिक मानत नाही', असा आरोप मराठी साहित्य क्षेत्रातील काही मंडळींकडून केला जातो. खरंतर, चरित्र लेखन अथवा व्यक्ती-चरित्र लिहिणं हा सुद्धा साहित्य प्रकारापैकी एक प्रभावी साहित्यप्रकार आहे. चरित्र-लेखन हा चारित्र्य निर्मितीचा एक साहित्यविष्कार आहे. अशा लेखनातून अनेक चरित्रकार अथवा चरित्र लेखक नावारूपास आले. चरित्रात्मक लेखन करणाऱ्या व्यक्ती मध्ये जिज्ञासा असते, विजिगीषू वृत्ती असते, उत्सुकता असते. त्रोटक अथवा अपूर्ण माहितीच्या आधारे व्यक्ती-चरित्र लिहिता येत नाही. त्यातही ऐतिहासिक व्यक्तिरेखा असतील तर सनावळ्या, पुरावे, विश्वासार्हता या बाबी महत्त्वाच्या. अभ्यासू, संशोधनात्मक लेखन करणारी व्यक्ती जिज्ञासू असते. या जिज्ञासू वृत्तीमुळे आपल्या चिंतनातून लेखक परिपूर्ण, आधारभूत असे लेखन करतो. मिळवलेली माहिती त्याच्या लेखन-कौशल्यातून, स्व-प्रतिभेच्या बळावर तो शब्दबद्ध करतो आणि हे लेखन करत असताना त्याच्या प्रतिभेचीही जोड देत असतो. काही प्रमाणात त्याची सर्जनशीलता वापरली जाते. त्यामुळे व्यक्ती-चरित्र वाचनीय ठरतात. पुढच्या पिढीसाठी आदर्शवत असा व्यक्ती-चरित्राचा खजिना लेखक निर्माण करतो. 'भारत मातेच्या वीरांगना' या पुस्तकाच्या लेखिका सौ. सोनाली तेलंग यांनी एक सुंदर, प्रेरणादायी असा चरित्र ग्रंथ लिहिला आहे. पुस्तकाचे शीर्षकच सूचक असल्याने वेगळं काही सांगायला नको. आपली भारत माता बहुप्रसवा आहे. अनेक स्त्री - पुरुष क्रांतिकारक या मातृभूमीत तयार झाले. देशासाठी आपल्या सर्वस्वाची आहुती देणारे अनेक क्रांतिकारक याच मातीत जन्मले आणि पुन्हा याच मातीत त्यांनी चिरनिद्रा घेतली. त्यातील अनेक क्रांतिकारक आजपर्यंत अनामिकच राहिले. अशा धगधगत्या राष्ट्र यज्ञातील समिधांसाठी लिहिलेले राष्ट्रगीत म्हणजे सोनाली तेलंग यांनी लिहिलेले, 'भारत मातेच्या वीरांगना' हे पुस्तक आहे. आपल्या देशातील जवळजवळ सर्वच राज्यांतील सर्व जाती धर्माच्या स्त्री क्रांतीकारकांची आणि त्यांनी केलेल्या सर्वस्वाच्या बलिदानाची माहिती या पुस्तकातून मिळते. ज्या काळात महिलांना घराच्या उंबरठ्या बाहेर सुद्धा पडता येत नव्हते, अशा स्वातंत्र्यपूर्व काळात या पुस्तकातील ७५ वीरांगनानी राष्ट्र-यज्ञाची ज्वाला प्रज्वलित केली. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने हे पुस्तक




स्वत:चे ध्येय हेच स्वत:चे जीवनकार्य समजा. प्रत्येक क्षणी त्या ध्येयाचे चिंतन करा.

लिहीत असताना, भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील केवळ ७५ वर्षांच्या नोंदी नाहीत, तर त्या आधीच्या विविध स्वातंत्र्यसंग्रामातील अनामवीरांच्या नोंदी आहेत.

१८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामा आधी इंग्रजांशी लढलेल्या राणी वेलू नाचीयार, जी आजवरच्या इतिहासातील पहिली महिला मानवी बॉम्ब बनली होती, तिच्या हौतात्म्याने, अभिमानाने ऊर भरून येतो. त्याच प्रमाणे १८५७ च्याही आधी इंग्रजांशी लढलेल्या राणी शिरोमणी, राणी चन्नम्मा देवी, अहिल्याबाई होळकर या अग्निशिखांच्या असीम शौर्याची माहिती लेखिकेने ओघवत्या शैलीत मांडली आहे. ऐतिहासिक व्यक्तिरेखा आणि प्रसंग लिहीत असताना, वाचकांना खिळवून ठेवणारी वीर रसयुक्त भाषाशैली ही लेखिकेची ताकद आहे.

या पुस्तकातील ७५ महिला वीरांगनांची निवड करताना सोनाली तेलंग यांना तारेवरची कसरत करावी लागली आहे. कारण अप्रकाशित, अनामिक अशा अनेक वीरांगनानी आपल्या प्राणांची आहुती दिली असल्याने सगळ्यांचा समावेश करणे शक्य नाही. या पुस्तकात अशा अनेक महिला क्रांतिकारकांचा समावेश न झाल्याने त्यांचे हौतात्म्य आणि योगदान किंचितही कमी होत नाही, होणार नाही याची जाणीव सोनाली तेलंग यांना आहे. अनेकांच्या सहकार्यातून आणि अभ्यास करून काही मोजक्या प्राथमिक महिला क्रांतिकारकांचा आणि त्यांच्या पराक्रमाचा इतिहास सांगणारे हे चरित्र पुस्तक आहे. आम्हाला रामप्रसाद बिस्मिल्ला माहीत आहे, पण त्यांची आई मूलमती माहीत नाही, आम्हाला शहीद भगतसिंगांची फाशी आठवते, पण भगतसिंगांची बहीण सुशीला देवी हिचा पराक्रम स्मरत नाही, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचे स्वातंत्र्य चळवळीत आणि स्वातंत्र्योत्तर काळातील योगदान आम्हाला आठवते, मात्र सरदारांची कन्या मनी बेन पटेल यांच्या पराक्रमाचे स्मरण होत नाही. भारत मातेच्या वीरांगनांची गाथा लिहीत असताना जन्माने विदेशी, पण भारतीय स्वातंत्र्यलढ्यात योगदान देणाऱ्या मॅडम भिकाजी कामा, पेरिन बेन कॅप्टन, मीठूबेन पेटीट, नेलीसेन गुप्ता, मीरा बहन, सरल बहन, भगिनी निवेदिता अशा महिला क्रांतिकारकांच्या पराक्रमाची ही नोंद या मालिकेत आवर्जून घेण्यात आलेली आहे. त्याचबरोबर भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात एकाच घरातील तीन स्त्रियांचे योगदान असलेल्या दोन कुटुंबांचाही समावेश आहे. तीन चाफेकर बंधूंच्या तीन पत्नी दुर्गाबाई, यमुनाबाई आणि सीताबाई; तसेच तीन सावरकर बंधूंच्या तीन पत्नी यशोदाबाई (येसू वहिनी) यमुनाबाई (माई) आणि शांताबाई यांच्या सारख्या अबोल, मात्र कृतिशील अग्नीशिखांच्या शौर्याचा इतिहास वाचकांना प्रेरित करून जातो. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात ज्या प्रमाणे प्राणाची आहुती देणाऱ्या अनेक अग्निशिखा आहेत, त्याचप्रमाणे जन्माला येण्याआधीच आईच्या गर्भात राष्ट्रप्रेमाचा जाज्वल्य वसा घेऊन जन्म घेणाऱ्या बाल क्रांतीशिखाही आहेत. गर्भारपणात स्वातंत्र्य लढ्यात स्वतःला झोकून देणाऱ्या काही वीरांगना आजही अनामिक आहेत. दोन महिन्यांच्या मुलीला घेऊन कारावास भोगणाऱ्या केरळच्या कुट्टी मालू अम्मा यांच्या त्यागाचे विस्मरण होऊन चालणार नाही. अजिजनबाई सारख्या गणिकेचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान वाचकांना अंतर्मुख करून जाते. या सगळ्यांच्या वीरकथा वाचताना आपण कधी नि:शब्द होतो तर कधी राष्ट्रप्रेमाच्या भावनेने वाचकांचा ऊर भरून येतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आजपर्यंत शाळा महाविद्यालयांतून जो बुळबुळीत इतिहास शिकवून स्वातंत्र्योत्तर युवा पिढीचे जे नुकसान झाले आहे, ते जर भरून काढायचे असेल, राष्ट्र प्रेमाने भारावलेली युवा पिढी तयार करायची असेल, तर 'भारतमातेच्या वीरांगना' सारखी पुस्तकं अभ्यासक्रमात लावायला हवीत. अलीकडे सत्तेच्या राजकारणात प्रतिमा आणि प्रतिकांची लढाई सुरू झाली आहे. महापुरुषांच्या त्यागावर प्रश्नचिन्ह

निर्माण करून गलिच्छ, हीन वक्तव्य केली जात आहेत. अशा स्वार्थांध राजकारण्यांनी या पुस्तकाचे पारायण करण्याची आवश्यकता आहे. त्याशिवाय त्यांना स्वातंत्र्याचे मोल समजणार नाही. झारखंडच्या जुळ्या बहिणी फुलो जानू मुरमु, जोगेश्वरी देवी फुकन, हंसाताई पाटील, नेली सेन गुप्ता, अक्कमा चेरीयन, यशोधरा दसप्पा, राजकुमारी अमृत कौर, अवंतीबाई लोधी, वंदनीय मावशी केळकर, कुंतला कुमारी सबत, अशी कितीतरी नावं आपल्याला माहीत नाहीत. ज्यांनी स्वातंत्र्यलढ्यात आपलं सर्वस्व दिलं अशा अनामिक वीरांगनांची नामावली न संपणारी आहे. सोनाली तेलंग यांनी खूप परिश्रमाने या पुस्तकाचे लेखन आणि निर्मिती केली आहे. हे पुस्तक म्हणजे स्वातंत्र्यलढ्यातील रणरागिनींच्या शौर्याचा इतिहास आहे, मातृभूमीच्या विजयाचे महन्मंगल स्तोत्र आहे. स्वातंत्र्यसंग्रामातील महिलांच्या शौर्य आणि त्यागाच्या इतिहासाचे एक महत्त्वाचे दस्तऐवज या निमित्ताने तयार झाले आहे. या पुस्तकाचा अनुवाद देशभरातील सर्व भाषांमध्ये झाला तर या पुस्तकाचे वाचक वाढतील, त्यांच्यापर्यंत हा इतिहास पोहोचायला हवा. त्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक. विशेषतः शिक्षक वर्गाने हे पुस्तक शाळा महाविद्यालयांत विद्यार्थ्यांपर्यंत न्यायला हवे. 'देशासाठी मी काय करू शकतो?' या प्रश्नाचे उत्तर म्हणजे या पुस्तकाचा, विचारांचा आणि या वीरांगनांच्या शौर्याचा, त्यागाचा प्रचार आणि प्रसार. हे मी नक्कीच करू शकतो. लेखिका सोनाली तेलंग यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

**– प्रा. डॉ. नरेंद्र पाठक**
साहित्य अकादमी सदस्य व ज्येष्ठ साहित्यिक,
ठाणे

•••

(पृष्ठ क्र.२१ वरून – **समकालीन आणि समकालीनत्व**)

त्याचवेळी आपल्या काळापासून अंतर ठेवून राहू, वेगळेपण जपू. वेगळ्या शब्दांत आपल्या काळाशी वियोग आणि कालविपर्यय. आपल्या काळाशी संबंधित कसं राहायचं?– तर त्याच्याशी संयोग ठेवायचा नाही आणि आपल्या काळापेक्षा वेगळ्या, विसंगत असणाऱ्या काळाशी संबंध जोडत राहायचं. त्याच्या शब्दांत–

Contemporariness is then, a singular relationship with one's own time, which adheres to it and, at the same time, keeps a distance from it. More precisely, it is that relationship with time that adheres to it through a disjunction and anachronism.

माझ्या शब्दांत सांगायचं तर, वर्तमानात पूर्णतः बुडून जाणं म्हणजे आंधळेपणा होय. आपल्या काळाशी काळाची बंधनं न पाळता चिकित्सक अंतर ठेवता येणं म्हणजे समकालीन असणं. आता इंग्रजीत सांगायचं तर– Absolute immersion in the present, absolute uptodatedness is blindness. One must keep distance from one's time to the end that it enables one to traverse in time interminably and uninhibitedly.

अभ्यासकाला असं 'समकालीनत्व' जोपासता यायला हवं. आपल्याला जमेल असं?...

**– डॉ. आनंद कुलकर्णी**
इंग्रजी विभाग प्रमुख
ग्रामोन्नती मंडळाचे कला विज्ञान व
वाणिज्य महाविद्यालय,
वारुलवाडी, नारायणगाव,
ता. जुन्नर, जि. पुणे– ४१०५०४

•••

# रोहित शर्मा आणि शेअरबाजार

*प्रस्तुत शीर्षकाच्या आधारे लेखक चंद्रशेखर टिळक यांनी रोहित शर्माचे अस्तित्व आणि शेअरबाजातील अपेक्षितता व अनपेक्षिता यांची विनोदी पद्धतीने परंतु वास्तवतेचा परामर्ष घेत सांगड घातलेली आहे. – संपादक*

रविवार, ३० ऑक्टोबर २०२२ रोजी ऑस्ट्रेलियात पर्थ मधे टी – २० विश्वचषकात भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात झालेली मॅच आपण सगळ्यांनीच पाहिली आहे.

किती छान हरलो की नाही आपण !

आपण हरलो हे निर्विवाद.

दक्षिण आफ्रिका जिंकली का? हा चर्चेचा मुद्दा होऊ शकतो.

चर्चा जरूर.

वाद जरासुद्धा नाहीं.

आणि याचे संपूर्ण श्रेय भारतीय क्रिकेट मधला सगळ्यात जास्त लाडावलेला खेळाडू.... माननीय श्री रोहित शर्मा.

Pampered ला आपल्या सभ्य मराठीत नेमके काय म्हणायचे हे मला कळत नाहीये म्हणून 'लाडावलेला' इतकेच म्हटले. त्याचा शब्दकोशात दिलेला अर्थ 'फाजील लाड' असा आहे हे मला पूर्ण माहिती असूनसुद्धा.

बघा ना!

या पठ्ठ्याने त्या दिवशी टॉस जिंकला.

आणि काय केलं ?

पहिली बॅटिंग घेतली....

तीही पर्थवर...

तीही दक्षिण आफ्रिकेच्या विरुद्ध...

त्यातही ते चार चार फास्ट बॉलर्स खेळवत असताना... रबाडा, पार्नेल, इंगिडी, नॉर्जे...

त्या प्रत्येकाची उंची सहा फूट किंवा त्यापेक्षाही जास्त!

अरे, हे सगळे वर्षानुवर्षं आयपीएल मधे खेळत आहेत.

बॉल स्विंग होतो आहे...

बॉल अक्षरश: उडत होता त्यादिवशी...

आणि

हे महाराज म्हणतात की, 'आमची पहिली बॅटिंग...'

तोफेच्या तोंडी जाण्याचे अस्खलित उदाहरण....

अरे पांडुरंगा, ती काय आपल्या गच्चीतली मॅच आहे का ?

माझी गच्ची, माझी बॅट म्हणजे माझी पहिली बॅटिंग !!!

अरे, आपला आकार काय आणि किती; आणि आपला प्रकार काय ?

हे म्हणजे अगदी शेअर – बाजारा सारखे झाले...

एकदम आयते कोलीत हातात.

''आंधळा मागतो एक,....''

---

भविष्यकाळ हा वर्तमानाच्या त्यागातून निर्माण होत असतो !

पण हातात दोन आले ते दक्षिण आफ्रिकेच्या.

आपल्या नव्हे.

अरे रोहित शर्मा, बाळा, शेअरबाजारात ओल्याबरोबर सुके जळते तसे सगळे भारतीय फलंदाज त्यादिवशी जळले की रे!

''महापुरे झाडे जाती तिथे लव्हाळी वाचती'' या न्यायाने सूर्यकुमार यादवचा काय तो अपवाद.... कोसळत्या बाजारातही एखादा एशियन पेन्ट्स, लार्सन टूब्रो, टीसीएस चालतो तसा!

मित्रा रोहित शर्मा, तू एकदम एलआयसी सारखा वागलास की रे ! भरांवशाच्या म्हशीला .... म्हणतात तसे!

एक सिक्स मारलीस आणि तू परत...

मुंबईच्या क्लब क्रिकेटमधे म्हणतात तसे 'रोहित, तुला आई बोलावते आहे' असे का रे कोणी तुला म्हणत होते?

हल्ली बरेच वेळा म्हणत असावेत.

त्यात तुला अगदीच एकटे एकटे वाटू नाही याची जबाबदारी के. एल. राहुल घेतोच.

शेअरबाजारात एलआयसी, झोमाटो, पेटीएमला म्हणतात रे तसे....

रोहित शर्मा आणि शेअरबाजार.....!!!!

त्यादिवशी बॅटिंगमधे ना तू खेळलास, ना राहुल,

नुसते कागदावर मोठे !

तू ना पाकिस्तान विरुद्ध खेळणार, ना दक्षिण आफ्रिका विरुद्ध. अगदी नंतर बांगला देश विरुद्ध सुद्धा नाही.

तुम्ही खेळायचे म्हणजे सारखे नेदरलँड कुठून आणायचे?

हे म्हणजे ना कौतुकाने महत्त्वाचे म्हणून सेन्सेक्स किंवा निफ्टी सारख्या शेअरबाजाराच्या महत्त्वाच्या निर्देशांकात जास्त वेटेज देत घ्यावे, तर बाजार कोसळताना तुम्हीच पहिले कोसळता !

रोहित शर्मा आणि शेअरबाजार.....

बॅटिंग झाली.

वाटले तू फिल्डींग मधे तरी ...

शेअरबाजारात नाही का लिस्टिंगच्या वेळी चांगला भाव मिळाला नाही तरी नंतर मिळेल असे वाटत राहते ना....

पण इथेही ये रे माझ्या मागल्या ! ...

चक्क विराट कोहलीने कॅच सोडला.

तू म्हणालास ...

मी कॅप्टन आहे ना !...

म्हणून विराटने एक कॅच सोडला, तर तू दोनदा रन - आऊट गमावलेस....

नको तिथे कुठे त्याच्याबरोबर स्पर्धा!

लिस्टिंग बरोबर लिस्टिंग नंतरही एलआयसी पडत राहातो तसे!

रोहित शर्मा म्हटले की मला शेअरबाजार आठवायचे अजून एक कारण म्हणजे, हे दोघेही फारसे काही बोलतच नाहीत. आताही बघा ना... रोहित शर्मा काही म्हणायच्या आधीच दुसरेच सांगत आहेत आपण मॅच का हरलो ते! म्हणे ''२०१८ नंतर आपण पर्थवर पहिल्यांदाच खेळत होतो. त्यामुळे पीचच्या लांबी - रुंदी - उंची - खोलीचा अंदाज आला नाही.

याआधी २०१८ ला पर्थला खेळलो ती टेस्ट मॅच होती आणि ती मॅचही आपण हरलो होतो. अरे सांगा ना रोहित राजाला की ''राजा, तुझा लाडका पोपट मेला''!

करा ना मान्य की, रोहित शर्माचा अठरावी ओव्हर अश्विनला द्यायचा निर्णय चुकला. पाकिस्तान विरुद्ध बॉल सोडून द्यायचे भारी बुद्धिबळ खेळत आश्विनने जे कमावले ते दक्षिण आफ्रिकेच्या विरुद्ध टाकलेल्या अठराव्या ओव्हरच्या पहिल्या दोन चेंडूत गमावले !

पण रोहित शर्मा आणि शेअरबाजाराला आपण हे कधीच सांगत नाही. (गुंतवणूकदार म्हणून आपला निर्णय चुकला हे कुठे आपण मान्य करतो ?... अगदी स्वतःशी सुद्धा नाही!)

बाजार पडला की आपण म्हणायला मोकळे असतो की, 'विदेशी वित्तसंस्थांनी विकले म्हणून शेअरबाजार निर्देशांक पडला.' अरे विठ्ठला, कोणीतरी तेंव्हाच विकू शकते ना, जेंव्हा तेंव्हाच कोणीतरी खरेदी करत असते!

रोहित शर्मा आणि शेअरबाजार.....

तरीही रोहित शर्मा आणि शेअरबाजार दोन्ही विषयी आम्हांला मनोमन एक आपुलकी !

कारण दोघेही आमच्या सारखेच मध्यमवर्गीय!

क्रियेतही आणि प्रतिक्रियेतही !

ना तू विराट कोहली सारखा मोकळेपणाने रडणार, ना मोकळेपणाने आनंद व्यक्त करणार; ना तोंडभरून शिवी देणार !

तो कोहली कसा पाकिस्तान विरुद्ध मजबूत खेळला आणि मग मस्त रडला !!

तुझे तसे नाही.

पाकिस्तान विरुद्धच्या त्याच मॅचमधे टॉसनंतर आपले राष्ट्रगीत झाले. त्यानंतर डोळे घट्ट मिटून तू जो चेहरा केलास ना तो आमच्या घरातल्या क्रिकेटच्या कर्त्या पुरुषाचा होता....

दबाव आहे हे मान्य करणार पण निसटतेच दाखवणार....

वाटले हे हवे आहे....

पण दक्षिण आफ्रिका विरुद्ध सगळे मुसळ....

हे म्हणजे पडत्या बाजारात सरकारी वित्तसंस्थांनी शेअरबाजार सावरावा तसे ....

रोहित शर्मा आणि शेअरबाजार....

तो कोहली कसा....

सहकाऱ्याला शिवी सुद्धा मनमोकळेपणाने देतो.

तुझा शिवी देताना सुद्धा चेहरा आवाज म्युट केल्यासारखा असतो...

संसारात नवऱ्याचा असतो तसा !...

आणि न बोलता शेअरबाजार एखाद्याला पाडतो तसा !

अनुष्का शर्मा सगळ्यांना नाही रे....

रोहित शर्मा आणि शेअरबाजार...

रोहित, तुझी एक जाहिरात आहे.

त्यात तू क्रिकेटर झाला नसतास तर केकवाला झाला असतास असे दाखवले आहे !

त्या जाहिरातीत तू केकवर मेणबत्ती लावायला जातोस आणि तो केकच ढेपाळतो असे दाखवले आहे!

त्यादिवशी मैदानात तुझे तसे काहीतरी होत होते.

(जाहिरातीवरून आठवले ... रोहित शर्मा एका म्युच्युअल फंड आणि एका शेअर ट्रेडिंग च्या जाहिरातीत पण आहे की !)

असू देत.

नसतो एखादा दिवस एखाद्याचा.

आम्ही सगळे अशी संधी तुला आणि शेअरबाजाराला देत असतो !

बाकीच्यांना नाही मिळत ती.

खोटे वाटते ?

आठव...

अरे, त्या बिचाऱ्या भुवनेश्वर कुमारने जेमतेम दोन - तीन मॅच मधे ती एकोणीसावी ओव्हर वाईट काय टाकली.... आयुष्याच्या शिव्या खाल्ल्या रे त्याने.

त्या कोवळ्या अर्शदीपने एक कॅच काय सोडला... किती ट्रोल झाला तो...

पण तुला कोण काय बोलले रे !!!

असे तुला न बोलण्यात तू भारतीय संघाचा कॅप्टन आहेस, अंबानींच्या मुंबई इंडियन्सचा कॅप्टन आहेस. हे नसते, तर आम्हांला सगळ्यांना तू आणि शेअरबाजार आमचे वाटता रे !!!

आम्हांला वाटत असते की तू क्रिकेटर झाला नसतास तर आमच्या सारखाच गल्लीत वडा - पाव खात फिरताना दिसला असतास !

कारण मुद्दलाची गोष्ट ही आहे की, रोहित शर्मा आणि शेअर - बाजार या गोष्टी अशा आहेत की, आपण त्याबाबत मनाने विचार करतो; डोक्याने नाही.

रोहित शर्मा आणि शेअरबाजार.....

अरे रोहित शर्मा बाळा, तो भुवनेश्वर, तो अर्शदीप, तो दिनेश कार्तिक बघ...

ते कसे उसळून उठतात.

आपली कामगिरी उंचावतात.

तुझे सगळे वेगळेच!

तरीही तू आणि शेअरबाजार आम्हांला जवळचे वाटतात.

त्याचे कारण तुम्हां दोघांचा Lazy Elegance...

आम्हांला तो लुभावतो.

पण परवडत नाही.

तुम्ही दोघे मात्र तो मस्त मिरवता....

रोहित शर्मा आणि शेअरबाजार.....

चालले नाहीत तर वाईट वाटते, पण राग येत नाही अशा दोन गोष्टी म्हणजे रोहित शर्मा आणि शेअरबाजार.

चालले नाहीत तरी असे न चालणे अल्पकालीन आहे, दीर्घकाळात नक्की चालतील अशी आशा असणारे दोन विषय म्हणजे रोहित शर्मा आणि शेअरबाजार.

चालले नाहीत म्हणजे 'सहन होत नाही पण सांगताही येतं नाही' असे दोन विषय म्हणजे रोहित शर्मा आणि शेअरबाजार.

''झाकली मूठ सव्वा लाखाची'' असे म्हणवत नाही असे दोन विषय म्हणजे रोहित शर्मा आणि शेअरबाजार.

पण खरं म्हणजे आपल्यापैकी कोणालाच रोहित शर्मा आणि शेअरबाजार यापैकी कोणालाही नावे ठेवण्याचा जरासुद्धा नैतिक अधिकार नाही.

(पृष्ठ क्र. ३१ वर)

# भवभूती

'खुल्या रंगमंचाचा उद्‌गाता' म्हणून पुरातत्त्व खात्याने गौरवलेल्या, राजदरबारापुरती मर्यादित असलेली नाट्यकला सामान्यांकरिता खुली करणारा, वीर आणि करुणा या प्रकारात त्यांच्या तोडीचा नसणारा, महाकवी आणि नाटककार म्हणून आठव्या शतकात गाजलेला विदर्भपुत्र 'भवभूती' विषयीची माहिती या लेखात दिलेली आहे.– संपादक

प्राचीन अभिजात संस्कृत काव्य आणि नाटकांच्या प्रांतात कालिदासाइतकेच मान्यताप्राप्त व्यक्तिमत्त्व म्हणजे भवभूती होय. महावीरचरित् नाटकाच्या प्रस्तावनेत नाटककाराविषयी सूत्रधार जी माहिती देतो, त्यावरून कळते की, भवभूतीच्या पूर्वजांचे कुलनाम उदुंबर असून ते तैत्तरीय शाखेचे ब्राह्मण होते. भवभूतीच्या महाकवी नामक पूर्वजाने वाजपेय नामक श्रौतयाग केला होता व ते दक्षिणपथात पद्मपूर नामक नगरात राहत असत. भवभूतीच्या पित्याचे नांव नीलकंठ असून मातेचे नांव जातुकर्णी असे होते. भवभूतीच्या पित्याला पवित्रकीर्ती असे संबोधले आहे. कै. महामहोपाध्याय वि.वा. मिराशी ह्यांच्यानुसार भवभूतीचा काळ सहाव्या शतकापासून ते इ.स. ७३० असा होता.


आमगाव तालुक्यातील पद्मपूर येथील भवभूतीचे उपेक्षित स्थळ.

भवभूतीने आपल्या नाटकाच्या प्रस्तावनेत वर्णन केल्याप्रमाणे त्याचे जन्मगाव दक्षिणपथात होते. दक्षिणपथ म्हणजे सामान्यतः नर्मदा नदीच्या दक्षिणेकडचा प्रदेश. 'नर्मदाया दक्षिणेन देशो दक्षिणेत:'. अर्थात, नर्मदेच्या दक्षिणेकडचा प्रदेश म्हणजे दक्षिणापथ होय. भवभूतीचे मूळ गाव दक्षिणपथात होते असा या उल्लेखावरून स्पष्ट होते. आता ते दक्षिणपथातील नेमके विदर्भातच कसे होते याचासुद्धा प्रत्यक्ष पुरावा भवभूतीच्या 'मालतीमाधव' या दुसऱ्या नाटकात आढळतो. सूत्रधाराच्या तोंडी 'अस्ती दक्षिणा पदे विदर्भेषु पद्मपूर नाम नगरम् !' असा स्पष्ट उल्लेख आहे. यावरून भवभूतीचे पद्मपूर जन्मस्थान हे प्राचीन विदर्भात होते, असे निश्चितपणे म्हणता येते. अर्थात, या बाबतीतसुद्धा मतभेद आहेतच. विदर्भात 'पद्मपूर' नावाची सात गांवे आढळतात. यात चंद्रपूर जिल्ह्यात दोन, भंडाऱ्यात तीन, तर गोंदिया जिल्ह्यात दोन गावांचा समावेश आहे. परंतु, या साऱ्या शंकांचा परामर्श घेऊन महामहोपाध्याय कै. वि. वा मिराशी यांनी वर्तमान गोंदिया जिल्ह्यात असलेले आमगाव नजीकचे पद्मपूर हेच भवभूतीचे जन्मस्थान असलेले प्राचीन पद्मपूर होय हे साधार सिद्ध केले. वर्तमान पद्मपूर येथे उपलब्ध प्राचीन पुरातत्वीय पुरावेसुद्धा त्यास दुजोरा देतात. भवभूतीवर जैन धर्माचा प्रभाव होता. या संबंधी जैन तीर्थंकरांच्या मूर्ती येथील उत्खननात सापडल्याने हेच भवभूतीचे जन्मस्थान असल्याचे शिक्कामोर्तब झाले. यासंदर्भात आमगाव येथील प्रा. ओ.सी.पटले यांनी अनेक गोष्टींचा उलगडा केला आहे.

भवभूतीचे प्राथमिक शिक्षण परमहंस ज्ञाननिधी नामक संन्याशाजवळ झाले. हे स्थान आमगाव नजीकच्या नाथबाबा पहाडावर स्थित आहे. इथेच त्यांनी 'महावीर चरित्' या ग्रंथाची रचना केली, असे मानले जाते.

त्यानंतरचे त्यांचे शिक्षण ग्वाल्हेरच्या नैऋत्येस ४२ कि.मी. अंतरावरील पद्मपवाया येथे झाले. येथे त्यांचे स्मारक असून, त्याच ठिकाणी त्यांनी 'मालतीमाधव' हा ग्रंथ लिहिला. त्यानंतर 'उत्तर रामचरित्' हा वाल्मीकी रामायणाचा उत्तरार्ध लिहून काढला.

पद्मपूर ते पद्मपवाया असा भवभूतीच्या शिक्षणाच्या प्रवासाचा मागोवा घेतला असता समजून येते की, वाकाटक राजे हे मूळचे बुंदेलखंडाचे रहिवासी असून, तेंव्हाच्या राजकीय परिस्थितीनुसार त्यांना विदर्भात यावे लागले. तसेच, पाचव्या शतकाच्या उत्तरार्धात पद्मपूरने काही काळ त्यांच्या राजधानीचे नगर म्हणूनही मान मिळवला होता. थोडक्यात, विदर्भ आणि बुंदेलखंड यांचे खूप आधीपासून असे जुने नाते होते.

असो. भवभूतीच्या पांडित्याची कीर्ती उत्तरेकडील कन्नोजचे महाराज यशोवन यांच्या कानावर पडताच त्यांनी भवभूतीची आपल्या दरबारी 'सभाकवी' म्हणून नेमणूक केली. इथे त्याच्या प्रतिभेस धुमारे फुटलेत. त्यांची साहित्यसेवा उत्कर्षास पोहोचली ती 'कालप्रिय नाथा' च्या वार्षिक जत्रेत. (पूर्वीचे 'कालप्रिय नाथाचे देवालय' म्हणजे तत्कालीन 'सूर्यमंदिर' हे वर्तमान काल्पी येथे होते आणि तेथे होणाऱ्या वार्षिक यात्रेमध्ये सर्वप्रथम भवभूतीची नाटके रसिकांसमोर आली.)

भवभूती केवळ संस्कृत पंडित नव्हता, तर अत्यंत रसिक असा श्रेष्ठ कवी व नाटककार होता. केवळ पांडित्याचा नाटक निर्मितीत काहीच उपयोग नाही, तर त्याकरिता वाणीची प्रौढता आणि अर्थगौरव हे गुण आवश्यक आहेत, असे प्रतिपादन ते करतात. वीर, श्रृंगार, करुणा अशा विविध रसांतील त्यांची नाटके सारखीच यशस्वी झालेली आहेत. समकालिनांनी त्यांच्या नाटकांना कालिदासाइतका दर्जा दिला नाही, त्यास निम्न प्रतीचे ठरवले, तेंव्हा क्रोधित होऊन भवभूतीने आपले ते प्रसिद्ध उद्‌गार काढले,' ते नाम केचिदिह न प्रथयन्त्यवज्ञां, जानन्ति ते किमपि तान्, प्रति नैष्य यत्न:/ उपत्स्यते तु मम को..पि समानधर्मा , कारो ह्ययं निरविधि:, विपुलता च पृथ्वी !! (मालती माधव १.६) याचा संक्षिप्त भावार्थ असा की, ''समकालीन विद्वानांनी जरी भवभूतीच्या रचनांची कदर केली नसेल, तरी काळ आणि पृथ्वी अनंत असून भविष्यात कधीतरी, कोणीतरी समानधर्मी गुणग्राहक भेटेल व भवभूतीला न्याय मिळवून देईल, असा विश्वास मला आहे. असे रसिकच माझ्या कृतीचे योग्य मूल्यमापन करू शकतील.''

पद्मपूर येथील उत्खननात जैन तीर्थंकरांच्या मूर्ती, शारदेची प्राचीन मूर्ती, हिंदू देवी-देवतांच्या मूर्ती शिवमंदिराच्या बांधकामांचे अवशेष, नटराजाची मूर्ती असे अनेक पुरावे पुरातत्त्व विभागाला सापडले आहेत. उत्खननात सापडलेली नटराजाची मूर्ती १९५० च्या सुमारास नागपूरच्या मध्यवर्ती संग्रहालयात ठेवण्यात आली. १९४७ पूर्वी इंग्रजांनी भगवान आदिनाथांच्या दोन मूर्ती येथून नेल्या. त्यांची भंडारा जिल्ह्यातील कारधा येथे वैनगंगा नदीच्या काठावर स्थापना केली. यापैकी एक मूर्ती तेथे असून दुसरी गायब आहे. विशेष म्हणजे, पद्मपूरात सापडलेली शारदेची खंडित मूर्ती लंडनच्या म्युझियममध्ये ठेवण्यात आलेल्या भारतीय मूर्तीपेक्षाही सरस असल्याचा दावा इतिहासकारांनी केला आहे.

वास्तवात, या साहित्याची जुळवाजुळव करून संग्रहालय उभारणे शक्य आहे. यातून भवभूतीच्या आठवणींना उजाळा आणि त्याच्या साहित्याचाही सन्मान होऊ शकतो. त्या अनुषंगाने लखनौचे पुरातत्त्व तज्ज्ञ श्री. जैन यांनी २०१४ मध्ये या ठिकाणी भेट दिली. राज्य सरकारच्या पुरातत्त्व विभागानेही अनेक वाऱ्या केल्या. मात्र, ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या स्थळाला उपेक्षेविना काहीच प्राप्त झालेले नाही.अजूनही महाराष्ट्रात पाहिजे त्या प्रमाणात भवभूती चर्चिला, अभ्यासला, नावाजला जाताना दिसत नाही. उलट हिंदीपट्ट्यात विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात त्यांच्या काव्यांचे,

नाटकांचे अध्ययन केले जाते. अजूनही वेळ गेलेली नाही. महाराष्ट्रातील संस्कृत अभ्यासकांनी, इतिहासकारांनी, संशोधकांनी, पुरातत्त्ववेत्यांनी आतातरी भवभूतीचे महत्त्व व एकूणच साहित्यिक, सांस्कृतिक इतिहासातील त्यांचे महत्त्वपूर्ण स्थान अभ्यासून त्यांची भविष्यवाणी सत्य ठरवावी.

दि.२२-४-२००० रोजी जवळच्या नातेसंबंधातील लग्नानिमित्त रात्रीच्या वेळी पद्मपूर जवळून जाणे झाले. तिथे अंमळ थांबलो असता बंदिस्त भिंतीपलीकडे पहुडलेले पद्मपूरचे ते जुने अवशेष न्याहाळण्याचा योग आला. हे अवशेष बघताना जाणवलं, जणू ते म्हणताहेत,' चालता-बोलता, हसता - नांदता खेळ अचानक सोडून गेलेत आमचे सवंगडी. ते नाहीतर, नवे चार गडी/ माणसं येतील आणि जुना खेळ परत मांडला जाईल. जिवंत स्पर्शासह मृत स्पर्शही जतन करणारे निष्ठावंत, आदिम स्मृती नि:शब्द जोडणारे पाषाण आहोत आम्ही! अजूनही आम्ही अवशेष वाटत असलो तरी हजारो वर्षांचं आयुष्य जगून आजही आमचं स्थान राखून आहोत आम्ही..! आमचं जाणं म्हणजे 'आपण खूप पुढे निघून आलोत' हा वर्तमानाचा अहंकार नष्ट करणारा ठरेल..! अजूनही आमची मनं जिवंत आहेत..! आठवणीत तो काळ आहे, त्या काळातील माणसं..! त्या माणसांच्या सांस्कृतिक, सामाजिक इतिहासाचं प्रतिबिंब आहोत आम्ही..! अजूनही आम्ही त्या माणसांची गाथा सांगायला पुरेसे आहोत. आजही आमच्या दगडी नाट्य-सभामंडपाच्या भग्नावशेषात भवभूतीचे खुले रंगमंच तुम्हाला दिसतील आणि उमजतीलसुद्धा..!

**- दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर,
नागपूर - ४४००२५
मो.नं.: ९८३४६३६६५५
इ-मेल- wandalkardilipgmail.com

•••

(पृष्ठ क्र.२८ वरून - **रोहित शर्मा आणि शेअरबाजार**)

कारण मुळात आपण स्वतः आणि शेअरबाजार व रोहित शर्मा यात जरासुद्धा फरक नाही.

आपणच तर एकमेकांना लाडावून ठेवले आहे.

वेळप्रसंगी आपण एकमेकांना जरी नावे ठेवली, अगदी टोकाची नावे ठेवली तरी मनोमन आपले स्वतःवर प्रेम असते.

मनोमन आपले रोहित शर्मावर प्रेम असते.

मनोमन आपले शेअरबाजारावर प्रेम असते.

कारण आपण वेळप्रसंगी तसे मुद्दामहून, ठरवून, जाणीवपूर्वक वागलेलो नसतो; तर त्या त्या वेळी नकळत आपल्या हातून तसे घडलेले असते, घडून गेलेले असते, यावर आपले प्रेम असते.

आपण असेच असतो.

रोहित शर्मा असाच असतो.

शेअरबाजार असाच असतो.

एकंदरीत काय,

रोहित शर्मा आणि शेअरबाजार यात असणारे अत्यंत महत्त्वाचे साम्य म्हणजे या दोघांच्या बाबतीत आपण आपले "One in hand is better than two in bush" हे तत्त्व खुंटीला टांगून ठेवले आहे !

कायमचे नसले तरी अनेकदा...

आपण, रोहित शर्मा आणि शेअरबाजार....

**- चन्द्रशेखर टिळक**
सी-४०२, राज पार्क,
मढवी बंगल्याजवळ, राजाजी पथ,
डोंबिवली (पूर्व), पिन - ४२१२०१
भ्रमणध्वनी - ९८२०२९२३७६

•••

हातावरील रेषांत दडलेले भविष्य बघू नका; त्याच हाताने कष्ट करा व स्वत:चे भविष्य घडवा !

# परिसर वार्ता

**- संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

**दीप अमावस्या –**

आषाढ महिन्याची अमावस्या ‘दीप अमावस्या’ म्हणून साजरी केली जाते. शिक्षकांनी मुलांना दिव्याची पूजा का करायची याची माहिती दिली. शुभंकरोती श्लोक म्हणून मुलांनी दीप – पूजन केले.

ज्यूनियर, सिनीयर के.जी. मधे विविध उपक्रम घेण्यात येतात –

**१) संगीत –**

आठवड्यातून एकदा नर्सरी, ज्यूनियर व सिनीयरच्या मुलांना संगीताची तासिका घेतली जाते.

विविध भाषांतील गाणी, वाद्यांची ओळख इ., गोष्टी वर्षभर या अंतर्गत शिकवल्या जातात.

**२) शारीरिक शिक्षण –**

रोज २० मिनीटांची एक तासिका मुलांना शारीरिक शिक्षणासाठी / खेळासाठी दिली जाते. त्या अंतर्गत विविध खेळ घेतले जातात.

दर सोमवारी सिनीयरच्या मुलांची ‘योगासने’ घेतली जातात. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात आमच्या पालक सौ. नमिता खंडागळे (योग शिक्षिका) यांनी मुलांसाठी योगासनांच्या तासिका घेतल्या.

- मंगळवारी मामाचं पत्र हरवलं, तळ्यात–मळ्यात, खोऽखोऽ सारखे खेळ शिकवले जातात.
- बुधवारी डंबेल्सचे व्यायाम प्रकार शिकवले जातात.
- गुरूवारी सांधिक खेळ किंवा संस्थेच्या प्रांगणातील टर्फ, ग्राऊंडवर मुलांना नेण्यात येते.
- शुक्रवारी मुलांना ट्रेमपोलिन व बागेतील उपकरणे (झोपाळा, घसरगुंडी) यांच्यावर खेळायला नेले जाते.
- महिन्यातून दोनवेळा ‘ॲरोबिक्स’ घेतले जातात.

**३) ग्रंथालय / वाचनालय –**

आठवड्यातून एकदा मुलांना ग्रंथालयात नेले जाते. ज्यूनियरची मुले चित्रांची पुस्तके बघतात, तर सिनीयरची मुले सोप्या, छोट्या गोष्टींची पुस्तके वाचायला शिकतात.

**४) दृक्–श्राव्य माध्यमातून शिक्षण (A.V. Lessons) –**

अभ्यासक्रमातील काही विषय व इतर निगडित माहितीपूर्ण गोष्टी प्रक्षेपण यंत्र (projector) व लॅपटॉप यासारख्या आधुनिक यंत्रांचा वापर करून दर गुरूवारी मुलांना दाखवले जातात.

**५) बनी टमटोला –**

या स्काऊट गाईड कार्यक्रमाअंतर्गत बनीची प्रार्थना घेतली जाते. चांगल्या सवयी, – जसे परिसर स्वच्छता, स्वत:ची शरीराची काळजी व स्वच्छता याबद्दल माहिती दिली जाते.

**६) कार्यपत्रिका (worksheets) –**

संपूर्ण वर्षभर दर आठवड्यातील शुक्रवारी सिनीयरच्या मुलांना कार्यपत्रिका सोडवण्यास दिली जाते, तर ज्यूनियरच्या मुलांसाठी शाळेच्या वेबसाईटवर ती अपलोड केली जाते. शिकवून झालेल्या अभ्यासक्रमाची उजळणी हा त्यामागचा हेतू आहे.

---

हसण्याचं मोल काय आहे हे रडल्यावरच कळतं !

**७) उपक्रम – बुधवार ७ ऑगस्ट २०२३**

**ज्यूनियर – मध्यम आकाराचे केळे सोलणे व चिरणे**

मुलांना घरून एक मध्यम आकाराचे केळे त्यांच्या डब्यात आणायला सांगितले होते. मुलांनी ते सोलून बिना-धारवाल्या सुऱ्या वापरून शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ते चिरले व खाल्ले.

**सिनीयर – मध्यम आकाराचा उकडलेला बटाटा सोलून, कापणे इ.**

मुलांनी घरून एक/ एक उकडलेला बटाटा आणला होता. मुलांनी तो सोलला, कुस्करला आणि त्यात चाट मसाला घालून खाल्ला.

**८) सर्वोत्तम शाळा बक्षीस –**

प्रेरणा संस्था, ठाणे तर्फे सौ. ए. के. जोशी शाळेला या वर्षीचा सर्वोत्तम शाळेचा पुरस्कार रविवार ३० जुलै २०२३ रोजी गडकरी रंगायतन येथे समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त)

**राष्ट्रीय सेवा योजना (NSS) आणि राष्ट्रीय छात्र सेना (NCC)**

आषाढी एकादशी निमित्त राष्ट्रीय सेवा योजना (NSS) आणि राष्ट्रीय छात्र सेना (NSS) यांच्या ३० स्वयंसेवकांनी वारकरी दिंडीमध्ये उत्स्फूर्तपणे आपला सहभाग नोंदवला.

२६ जून २०२३ रोजी अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त ठाणे पोलिस आयुक्तालय यांच्यातर्फे प्रभात फेरी आयोजित करण्यात आली होती यामध्ये या स्वयंसेवकांनी आपला सहभाग नोंदवला.

राष्ट्रीय सेवा योजनेचे दोन स्वयंसेवक कुमार अद्वैत राऊळ आणि कुमारी हनिफा सुर्वे मुंबई विद्यापीठातर्फे आयोजित योगा कॅम्पमध्ये सहभागी झाले होते.

**रक्तदान शिबिर**

महाविद्यालयाच्या वन महाराष्ट्र बटालियन एनसीसी बॉईज विंग, राष्ट्रीय सेवा योजना, डीएलएलई विभाग, जिमखानाला विभाग, लायन्स क्लब ऑफ कांजूर-विक्रोळी यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सिव्हिल हॉस्पिटल, ठाणे यांच्या सहकार्याने महाविद्यालयाच्या जिमखान्यात भव्य रक्तदान शिबिर १९ जून २०२३ रोजी संपन्न झाले. सदर शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोझेस कोलेट, लायन्स क्लबचे अध्यक्ष व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. शिबिर यशस्वी करण्यासाठी एनसीसी प्रमुख कॅप्टन बिपीन धुमाळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. उज्ज्वला गोखे, डॉ. प्रल्हाद वाघ व डॉ. आकांक्षा शिंदे, प्रा. अनिल आठवले व जायंटस वेल्फेअर फाऊंडेशन वन सी चे कौन्सिल सदस्य सेवानिवृत्त प्रा. प्रकाश माळी, ठाणे सिव्हिल हॉस्पिटलचे डॉक्टर्स, नर्सेस व स्टाफ तसेच एनसीसी व एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी अतिशय परिश्रम घेतले. या शिबिरात प्रा. दर्शना चव्हाण, प्रा. सुनील भुसारा, प्रा. विनोद थोरात, प्रा. कादंबरी मांजरेकर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्यासह ५२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

२१ जून २०२३ रोजी राष्ट्रीय छात्र सेनेच्या स्वयंसेवकांनी आंतरराष्ट्रीय योगा दिनाच्या निमित्ताने योगासत्रात सहभाग नोंदवला.

**शिक्षकांचे यश**

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर मोजेस कोलेट यांना एपीजे अब्दुल कलाम शिक्षा सर्वोच्च सन्मान २०२३ प्राप्त झाला.

जैवविविधता आणि वन्यजीव संवर्धन व व्यवस्थापन या विभागाचे सहाय्यक प्राध्यापक श्री आदित्य म्हात्रे SET ही परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले.

३० जून २०२३ रोजी सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातर्फे आयोजित परिषदेमध्ये प्राचार्य डॉ. मोजस कोलेट, डॉ. कल्पिता मुळे, डॉ. जयश्री पवार, डॉ. ऊर्मिला कुमावत, कुमारी अस्बा शेख व कुमारी सायली दप्तरदार हे सहभागी झाले होते.

१४ जून २०२३ रोजी महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग व मुंबई विद्यापीठाच्या के सी महाविद्यालयातर्फे मुंबई येथे ''राष्ट्रीय शिक्षण धोरण'' या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत डॉ. विंदा मांजरमकर, डॉ. अनिता गोस्वामी गिरी आणि प्राचार्य डॉ मोजेस कोलेट सहभागी झाले होते.

१५ जून २०२३ रोजी इंटरनल क्वालिटी अशुरन्स सेल समन्वयक आणि प्राणीशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका डॉ विंदा मांजरमकर यांची उपप्राचार्य पदी नियुक्ती करण्यात आली.

१५ आणि १६ जून २०२३ रोजी महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग व के. जे. सोमय्या महाविद्यालय स्वायत्त विद्याविहार येथे Implementation of NEP in Autonomous Colleges या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत डॉ. विंदा मांजरमकर, डॉ. अनिता गोस्वामी गिरी आणि प्राचार्य डॉ. मोजेस कोलेट सहभागी झाले होते.



**महाविद्यालयीन उपक्रम**

२१ जून २०२३ रोजी श्री अंबिका योग कुटीर आणि महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने योग दिन साजरा करण्यात आला यामध्ये १५० विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर सहकारी सहभागी झाले होते.



२४ जून २०२३ रोजी Anti Narcotics Cell व ठाणे पालिस यांच्यातर्फे "Ill Effects of Drugs/ Narcotics" या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत बांदोडकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून पारितोषिके पटकावली.

महाराष्ट्र सरकार तर्फे आयोजित ''सेल्फ डिफेन्स फॉर गर्ल्स'' या उपक्रमांतर्गत पतंजली सभागृह येथे प्रशिक्षण कार्यक्रम ३ ते ५ जुलै २०२३ रोजी आयोजित करण्यात आला होता. या प्रशिक्षण कार्यक्रमात ४५० विद्यार्थिनींनी प्रशिक्षण घेतले.



**वनस्पती शास्त्र विभाग**

वनस्पती शास्त्र विभागातर्फे "Careers Building" या विषयावर डॉ. ऊर्मिला कुमावत, सहाय्यक प्राध्यापक यांचे व्याख्यान २७ व २८ जून २०२३ रोजी आयोजित केले होते. वनस्पतीशास्त्र व त्यासंबंधी विषयाबद्दल विविध नोकरीच्या संधीबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. द्वितीय वर्ष व तृतीय वर्ष विज्ञान शाखेचे मिळून तेरा विद्यार्थी या व्याख्यानाला उपस्थित होते




**ग्रंथालय विभाग**

**छत्रपती शाहू महाराज जयंती**

ग्रंथालय विभागातर्फे २६ जून २०२३ रोजी छत्रपती शाहू महाराज यांच्या १४९ व्या जयंती निमित्त छत्रपती शाहू महाराज यांच्यावरील माहितीचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या एकूण कार्याचा थोडक्यात आढावा सादर केला.

**Internal Quality Assurance Cell**

इंटरनल क्वालिटी अशुरन्स सेल (IQAC), खारफुटी संस्था आणि वन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने खारफुटी दिनाच्या निमित्ताने २५ व २६ जुलै २०२३ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. २५ जुलै २०२३ रोजी पोस्टर सादरीकरण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत १५ विद्यार्थ्यांनी पोस्टरच्या माध्यमातून सादरीकरण केले. कु. वरदा चव्हाण हिने प्रथम पारितोषिक, कु. संपदा कुलकर्णी हिने द्वितीय तर कु. श्रुती पाटील हिने तृतीय पारितोषिक पटकावले. कु. संस्कृती मौर्य हिला प्रथम उत्तेजनार्थ, तर कु. वैष्णवी चव्हाण व कु. नादर मेलविन यांना द्वितीय उत्तेजनार्थ पारितोषिक विभागून देण्यात आले. २६ जुलै २०२३ रोजी 'खारफुटी संवर्धन' याबाबत विविध तज्ज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी ६६ विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते.







**विद्या प्रसारक मंडळाचे**
**ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय**

महाविद्यालय २०२३-२०२४ चे माहितीपत्रक, महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर दि. १ जुलै २०२३ रोजी संक्रमित करण्यात आले आहे.

**ओरिएंटेशन कार्यक्रम :**

३ जुलै २०२३ रोजी ऑनलाइन ओरिएंटेशन आयोजित करण्यात आले होते. प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार तिसऱ्या वर्षाच्या एल. एल. बी. विद्यार्थ्यांसाठी, - त्यांना V आणि VI च्या सेमिस्टरमधील विविध विषयांसह त्यांचे महत्त्व थोडक्यात समजावून सांगितले. तपशील रचना व व्यावहारिक प्रशिक्षण ह्यांसह मूट कोर्टचे प्रशिक्षणाची माहिती देण्यात आली.

**२०२३-२४ साठी प्रथम वर्ष एल.एल.बी. प्रवेश :**

प्रथम वर्ष एल.एल.बी. उमेदवारांच्या सोयीसाठी महाविद्यालयाने, प्रथम वर्ष एल.एल.बी. प्रवेशाचे MCQs संकेतस्थळावर संक्रमित करण्यात आले आहेत.


**८ जुलै २०२३ रोजी बार काऊन्सील ऑफ महाराष्ट्र आणि गोवा, बेसिक लीगल एज्युकेशन कार्यक्रमाचे उद्घाटन :**



८ जुलै रोजी बार काऊन्सील ऑफ महाराष्ट्र आणि गोवा, ह्यांनी ८ जुलै रोजी आयोजित केलेल्या बेसिक लीगल एज्युकेशन कार्यक्रमाचे उद्घाटन प्रभारी प्राचार्या श्रीविद्या जयकुमार ह्यांच्या हस्ते करण्यात आले.



सदर कार्यक्रमात महाविद्यालयास बार काऊन्सील ऑफ महाराष्ट्र आणि गोवा तर्फे ''हॅन्ड बुक ऑफ क्रिमिनल (प्रॅक्टिस मॅन्युअल)'' आणि ''हॅन्ड बुक ऑफ सिव्हिल (प्रॅक्टिस मॅन्युअल)'' पुस्तके भेट देण्यात आली.




**सेमिस्टर II ची पूर्वतयारी परीक्षा :**

| तारीख | विषय |
|---|---|
| १८ जुलै २०२३ | संविधान |
| १९ जुलै २०२३ | पर्यावरण कायदा |
| २० जुलै २०२३ | कौटुंबिक कायदा - एक |
| २१ जुलै २०२३ | गुन्ह्याचा कायदा |

विद्या प्रसारक मंडळाचे विधी महाविद्यालयामध्ये ८ आणि ९ जुलै रोजी कोर्ट विभागाच्या परीक्षा घेण्यात आल्या.

**एल एल. बी सत्र VI चा निकाल :**

सेमिस्टर VI एल.एल.बी.चा निकाल १० जुलै २०२३ रोजी जाहीर झाला.

कॉलेज उत्तीर्णतेची टक्केवारी ८०.८४% आहे. तसेच प्रथम श्रेणी मिळविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ९३ कु. प्रियांका आचार्य ७३% मिळवून महाविद्यालयात अव्वल ठरली. तसेच महाविद्यालयाच्या सुवर्णपदकासाठी आणि ॲड. श्रीनिवास ओक रोख बक्षीससाठी पात्र ठरली आहे.

द्वितीय क्रमांक भाग्यश्री आचार्य आणि तृतीय क्रमांक नेहा बहेलिया आहे. सर्व उत्तीर्ण झालेले विद्यार्थ्यांचे अभिनंदन.

**आपत्ती व्यवस्थापन कायदा प्रमाणपत्र कार्यक्रम :**

आपत्ती व्यवस्थापन कायद्यातील प्रमाणपत्र कार्यक्रमात IV सत्रातील विद्यार्थ्यांसाठी खुला करण्यात आला, निकाल ४ जुलै २०२३ रोजी जाहीर करण्यात आला, २६ विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. तसेच ७ विद्यार्थ्यांना 'O' श्रेणी



मिळाली. सदर कार्यक्रमाच्या समन्वयक श्रीमती कृष्णा कामथ होत्या.

**विधी बंध आणि विधी फाऊंडेशन : स्टडी सर्कल व्याख्यान :**

२२ जुलै रोजी विधी बंध महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटना आणि विधी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्टडी सर्कलमध्ये ठाणे विधी महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते. ठाणे कोर्ट बारच्या वकिलांनीही सहभाग घेतला. बारमध्ये ४० वर्षांहून अधिक काळ अनुभव असलेले ज्येष्ठ वकील श्री परांजपे यांचे, 'गुन्हेगारी खटला कसा चालवायचा?' या विषयावर व्याख्यान होते.

माजी विद्यार्थी आणि 'गुन्हेगारी बाजू' मध्ये प्रॅक्टिस करणारे प्रसिद्ध वकील सुदीप पासबोला ह्यांची महाविद्यालयास भेट



२४ जुलै रोजी तृतीय वर्ष प्रवेशाची सूचना देण्यात आली. प्रवेशासाठी पात्रता, शुल्क आणि प्रवेशाचे वेळापत्रक तयारीच्या सोयीसाठी विद्यार्थांना अधिसूचित केले गेले.

**एल.एल.बी. सत्र IV चा निकाल :**

सेमिस्टर IV चा निकाल २८ जुलै २०२३ रोजी जाहीर करण्यात आला. उत्तीर्णतेची टक्केवारी ८५.८५%

प्रथम क्रमांक – रिंकी दुबे

द्वितीय क्रमांक – सायली सावंत

तृतीय क्रमांक – प्रियांका चोटानी

**पॉक्सो कायद्याबाबत ऑनलाइन जनजागृती कार्यशाळा:**

२९ जुलै २०२३ रोजी पॉक्सो कायद्याबाबत ऑनलाइन जनजागृती कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेसाठी ९६ जणांनी उपस्थिती दर्शवली. ॲड कोमल गोपाल सिन्हा आणि डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले

१. कायद्याची तरतूद.

२. शालेय विद्यार्थ्यांसह साक्षरता सत्र हाताळणे.

ह्या विषयांवर माहिती देण्यात आली, महाविद्यालयाच्या लीगल एड सेलच्या वतीने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

**विद्या प्रसारक मंडळांचा स्थापना दिवस – १ ऑगस्ट २०२३**

**स्पर्धा विजेत्या विद्यार्थ्यांची बक्षीस वितरण यादी**

| विद्यार्थ्यांचे नाव | विभाग | तपशील | बक्षीस |
|---|---|---|---|
| १) कु. मेहेर झा<br>२) कु. रचित जाधव | द्वितीय वर्ष<br>तृतीय वर्ष<br>इंडस्ट्रियल<br>इलेक्ट्रॉनिक्स विभाग | टेक्निकल<br>पेपर सादरीकरण<br>विषय –<br>**"ॲडव्हान्स इन ऑटोमोबाईल (हायब्रीड वाहन)"** | राष्ट्रीय स्तरावरील प्रथम पारितोषिक |


| **विद्यार्थ्यांचे नाव** | **विभाग** | **तपशील** | **बक्षीस** |
|---|---|---|---|
| ३) कु. मेहेर झा<br>४) कु. गौरव जराड<br>५) कु. वेदांत जुनारराव<br>६) कु. रचित जाधव | द्वितीय वर्ष<br>द्वितीय वर्ष<br>तृतीय वर्ष<br>तृतीय वर्ष<br>इंडस्ट्रियल<br>इलेक्ट्रॉनिक्स विभाग | टेक्निकल पेपर<br>सादरीकरण<br>विषय -<br>"Night Patrol Robot<br>Using IOT" | राज्य स्तरावरील<br>प्रथम पारितोषिक |
| ७) कु. गौरव जराड | द्वितीय वर्ष<br>इंडस्ट्रियल<br>इलेक्ट्रॉनिक्स विभाग | टेक्निकल प्रश्नमंजुषा<br>स्पर्धा | राज्य स्तरावरील<br>प्रथम पारितोषिक |
| ८) कु. तेजस धुरे | इंडस्ट्रियल<br>इलेक्ट्रॉनिक्स विभाग | टेक्निकल प्रश्नमंजुषा<br>स्पर्धा | राज्य स्तरावरील<br>द्वितीय पारितोषिक |
| ९) कु. सार्थक प्रवीण तिवाड | तृतीय वर्ष<br>कॉम्प्युटर इंजिनीअरिंग<br>विभाग | टेक्निकल प्रश्नमंजुषा<br>स्पर्धा<br>टेक्निकल पेपर सादरीकरण | राज्य स्तरावरील<br>प्रथम पारितोषिक<br>राज्य स्तरावरील<br>द्वितीय पारितोषिक |
| १०) कु. शिवानी गणेश बोडके | तृतीय वर्ष<br>कॉम्प्युटर इंजिनीअरिंग<br>विभाग | टेक्निकल पेपर सादरीकरण | राज्य स्तरावरील<br>द्वितीय पारितोषिक |
| ११) कु. विशाल विनोद धनवे | तृतीय वर्ष<br>इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिम<br>विभाग | टेक्निकल पेपर सादरीकरण | राज्य स्तरावरील<br>द्वितीय पारितोषिक |
| १२) कु. आदित्य जाधव<br>१३) कु. पार्थ जोशी | तृतीय वर्ष<br>इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिम<br>विभाग | टेक्निकल पेपर सादरीकरण<br>पेपर<br>Solar Photovoltaic Wind Energy Hybrid System: Simulation Analysis | राज्य स्तरावरील<br>प्रथम पारितोषिक |
| १४) कु. अर्थव खांडेराव<br>१५) कु. वैभव भगत | तृतीय वर्ष<br>इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिम<br>विभाग | टेक्निकल पेपर सादरीकरण<br>विषय - Renewable Energy<br>By Foot Step | राज्य स्तरावरील<br>द्वितीय पारितोषिक |

| विद्यार्थ्यांचे नाव | विभाग | तपशील बक्षीस |
|---|---|---|
| १६) कु. गौतम केळकर | द्वितीय वर्ष इंस्ट्रुमेंटेशन विभाग | ''आझाद हिंदाची गाथा'' या कार्यक्रमासाठी विद्यार्थी समन्वयकाला विशेष पारितोषिक (२३ मार्च २०२३ रोजी सांस्कृतिक कार्य मंत्रालय आणि MSBTE द्वारे आयोजित स्वातंत्र्याचे ७५ वे वर्ष साजरे करण्यासाठी नाट्य कार्यक्रम) |
| १७) कु. श्रावणी विवेक सावंत | तृतीय वर्ष कॉम्प्युटर इंजिनीअरिंग विभाग | • राष्ट्रीय स्तरावरील टेबल टेनिस खेळाडू<br>• जिल्हा चॅम्पियन<br>• राज्यस्तरीय ४ पुरस्कार<br>• तिने महाराष्ट्र आणि ठाणे जिल्ह्याचे ३ पेक्षा जास्त वेळा प्रतिनिधित्व केले.<br>• ती महाराष्ट्राच्या १७ वर्षाखालील मुलींच्या संघाची कर्णधार होती. (बडोदा येथे आयोजित) |

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

### जुलै २०२३ मधील कार्यक्रम / वार्ता

**३ जुलै :** डॉ. श्रीपाद बापट यांची आर. सी. पटेल फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, शिरपूर. द्वारे २०२० च्या नवीन शैक्षणिक धोरणा नुसार निकालावर आधारित शैक्षणिक मूल्यमापन पद्धती प्रमाणे एमबीए अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी बाह्य परीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली.



Shirpur Education Society's
R C Patel Institute of Pharmaceutical Education and Research, Shirpur
आर सी पटेल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, शिरपूर
Autonomous
(Affiliated to KBC North Maharashtra University, Jalgaon)

Date:03/07/2023

To
Dr Shripad Bapat
Dr. V. N. Bedekar Institute of Management Studies,
Thane

Subject: Appointment as paper setter for EVEN session End Sem Exam II Term 2022-23

Dear Sir / Madam,

Thanks for accepting our request. The details of the question papers to be set by you are furnished as enclosed.

**६ जुलै : ब्रिम्सच्या InnoSIP स्पर्धेसाठी माजी विद्यार्थ्यांकडून प्रायोजकत्व :**



२०११-१३ मधील माजी विद्यार्थी व @ २४९ मीडिया - डिजिटल जाहिरात एजन्सी चे संचालक, श्री. सुयोग पाटील तसेच



२०१३-१५ मधील माजी विद्यार्थी व स्त्री सन्मान या संस्थेचे, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. आनंद निकम यांनी ब्रिम्सच्या InnoSIP स्पर्धेसाठी दिलेल्या प्रायोजकतेबद्दल ब्रिम्स कृतज्ञता व्यक्त करत आहे.

**८ जुलै :** डॉ. नीतिन जोशी यांनी गोदरेज एरोस्पेस येथे कर्नल मिलिंद एस. यांच्या सह(इंटर्नशिप) पदवीपूर्व सेवा प्रकल्पा संदर्भात भेट दिली.

**१० जुलै :** डॉ. नीतिन जोशी आणि सहाय्यक प्रा. विभूती सावे यांनी राजीव गांधी कॉलेज ऑफ मॅनेजमेंट स्टडीज येथे एनबीए मान्यते साठी तयारी सत्र आयोजित केले.




**१३ जुलै :** सहाय्यक. प्रा. संदीप मोघे यांनी एमबीए प्रवेश साठी इच्छूक विद्यार्थ्यांसाठी ''आजच्या व्यवसायाच्या जगात तंत्रज्ञानाची भूमिका'' या विषयावर एक मार्गदर्शन सत्र घेतले.




**१४ जुलै :** ए आय एम एस तर्फे आयोजित इन्स्पायरिंग यंग लीडर्स ऑन ''इनोवेटिव्ह मेथड्स बियॉन्ड केस स्टडीज'' या विषयावरील सत्रात डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी भाग घेतला.


AIMS
ASSOCIATION OF INDIAN MANAGEMENT SCHOOLS
PARTICIPATION CERTIFICATE
This is to certify that
Dr. Pallavi Chandwaskar
has attended an Inspiring Young Leaders Session titled "INNOVATIVE METHODS BEYOND CASE STUDY" organized on 14th July 2023 by Association of Indian Management Schools (AIMS).
Dr R Nandagopal
President, AIMS

**२४ जुलै :** आर्ट ऑफ लिव्हिंग फाऊंडेशनतर्फे २४ जुलै २०२३ ते १ ऑगस्ट २०२३ या कालावधीत भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या ''इंडिया मेडिटेट्स – हर घर ध्यान'' उपक्रमांतर्गत डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी एका आठवड्याच्या 'ध्यान' कार्यक्रमात भाग घेतला.


India MEDITATES
Azadi Ka Amrit Mahotsav
THE ART OF LIVING
Certificate of Participation
This certificate has been awarded to
Pallavi Chandwaskar
for active participation
in
"Har Ghar Dhyan Session"
an Initiative of
Ministry of Culture, Goverment of India
Organised by
The Art of Living

**२६ जुलै : कपडे आणि धान्य संकलन मोहीम:**

बी. एन. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने, डॉ.व्ही.एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजच्या सी.एस.आर. समिती तर्फे २६ ते २८ जुलै २०२३ या तीन दिवसीय कपडे आणि धान्य संकलन मोहिमेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा प्राथमिक उद्देश स्थानिक भागातील वंचित समुदायांसाठी आवश्यक वस्तू गोळा करणे आणि त्यांचे वितरण करणे हा होता. प्राध्यापक सदस्यांनी सक्रिय सहभाग घेतला आणि मोहिमेत योगदान दिले.

**२६ जुलै : कारगिल विजय दिवस :**

बी एन बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने, डॉ.व्ही.एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज च्या सी एस आर समिती तर्फे कारगिल विजय दिवसाचे महत्त्व सांगण्यासाठी एका

स्मरणार्थ कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कारगिल युद्धात आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शूर सैनिकांचा सन्मान करणे आणि सहभागींमध्ये देशभक्ती आणि सशस्त्र दलांबद्दल आदराची भावना जागृत करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. कार्यक्रमाची सुरुवात एका संक्षिप्त उद्घाटन समारंभाने झाली, कारगिल विजय दिवसाचे महत्त्व आणि कार्यक्रमाच्या उद्दिष्टांची ओळख करून देण्यात आली. सहभागींनी सक्रियपणे चर्चा केली आणि युद्धाबद्दल त्यांचे विचार आणि भावना व्यक्त केल्या. एकंदरीत, कारगिल विजय दिवस कार्यक्रमाने देशभक्ती वाढवणे, आपल्या सैनिकांच्या बलिदानाचा सन्मान करणे आणि कारगिल युद्धाच्या महत्त्वाविषयी जागरूकता निर्माण करणे हे आपले उद्दिष्ट यशस्वीरित्या साध्य केले.




**२७ जुलै :** डॉ. नीतिन जोशी, जे डब्ल्यू मॅरियट मुंबई येथे टेक्नॉलॉजी इन एजुकेशन या विषयावरील बैठकीला उपस्थित राहिले.

**२९ जुलै :** शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण करण्यात आले. सरसमितीचे सदस्य व सेंट फ्रान्सिस मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटचे उपसंचालक, प्राध्यापक डॉ. जी. रमेश आणि एन. जी. बेडेकर महाविद्यालयाच्या सहयोगी प्राध्यापक, डॉ. रश्मी अग्निहोत्री यांनी परीक्षण केले.

मे आणि जून २०२३ मधील उन्हाळी पदवीपूर्व सेवा प्रकल्पासाठी, आमच्या सहा विद्यार्थ्यांची ठाण्यातील अरिहंत ग्रुपमध्ये निवड झाली. आमच्या दोन विद्यार्थ्यांचे टॉप परफॉर्मर आणि बेस्ट इंटर्न पुरस्कार देऊन कौतुक करण्यात आले. सर्वोत्कृष्ट इंटर्न पुरस्कार प्रथमेश उगले यांना प्रदान करण्यात आला. तर कुणाल पाटील यांना उत्कृष्ट कामगिरीचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अरिहंत ग्रुपमध्ये इतर व्यवस्थापन संस्थेतील विद्यार्थी देखील कार्यरत होते.





•••

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.